मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज विरचित
सूक्तिरत्नावली यष्टी १४ वी
(१५, १७ व १८ यांच्या प्रथमावृत्तीतून ४ सांख्यग्रंथांसह)

# १. नारदीयभक्तिसूत्रभाष्य

# २. प्रियलीलामहोत्सव : आगमनविलास

(भागवतावरील गद्यपद्यान्वित टीका : उत्तरार्ध)

# ३. सांख्य-सुरेन्द्र

***

**४.** सांख्यसुरेन्द्र : गद्य **५.** सांख्यसार-भाष्य : गद्य
**६.** सांख्यसूत्रे काही विचार (य१५) **७.** एक निबंध (य१५)





''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

००

प्रकाशक
**॥ श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहीसाथ, अमरावती ॥**
कलिवर्ष : ५०१०८ / इ.स.२००६

**रु. ८०**

*

आवृत्ति १ ली इ.स. १९४९
आवृत्ति २ री इ.स. २००६

*

**॥ ग्रंथोपलब्धि ॥**

**श्रीज्ञानेश्वर संस्थान**
पाताळेश्वर मार्ग, महाल, नागपूर ४४०००२

*

श्रीरंग घटाटे
'गोकुळ' घटाटे ले आउट - ९, व्हीआयपी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर. ४४००१
मो.९३७२५२९७७० / टेली.०७१२-२५३३९९७

*

**संत श्रीगुलाबरावमहाराज भक्तिधाम, चांदूरबाजार,**
जि. अमरावती. टे.०७२२७–२४३१३१

*

**श्रीगुलाबरावमहाराज सर्वोदय ट्रस्ट**
**आळंदी** (देवाची)
ता.खेड, राजगुरुनगर, जि.पुणे मो.- ९४२३००६२०८ / ९८२२४४०५९१

*

www.gulabraomaharaj.org

# ग्रंथांचा अनुक्रम

१. **नारदीयभक्तिसूत्रभाष्य** **(१)**

(ओवीबद्ध. ओवी संख्या - १९० + १६८ = ३५८)

२. **प्रियलीलामहोत्सव उत्तरार्ध ः आगमन विलास *** **(५७)**

(भागवतावर गद्यपद्यात्मक टीका / ओवी ७०६ + ५२५ = १२३१)

३. **सांख्य-सुरेन्द्र** **(१८७)**

(महर्षि कपिलांच्या ५७ सूत्रांवर ओवीबद्ध भाष्य)

४. **सांख्य सुरेन्द्र** **(३०९)**

गद्य

५. **सांख्यसार** **(३९१)**

गद्य (यष्टी १८ तून)

६. **सांख्यसूत्रे काही विचार** **(४०२)**

(यष्टी १५ तून)

७. **सांख्यावरील एक निबंध** **(४१२)**

(यष्टी १५ तून)

........................................................................................

प्रियलीलामहोत्सव (पूर्वार्ध) यष्टी ३ री

**''आमंत्रणविलास''**

........................................................................................





## महत्वाची सूचना

या आवृत्तीत श्रीमहाराजांच्या शिष्यपंचायतनातील **पू. भाऊसाहेब खापरे** यांनी तयार केलेल्या विषयसूचिग्रंथातील म्हणजे **''माधुर्यमधुकोशातील''** संदर्भ पाहणे सोयीचे व्हावे म्हणून मजकुरासोबत प्रत्येक पानावर कंसात **क्रमांक** टाकले आहेत, ते यष्टि १४ चे **प्रथम आवृत्तीचे पान-क्रमांक** आहेत कारण कोशात तशीच नोंद आहे.

उदा. **(य.१४-२३)**

हे अभ्यासूंनी लक्षात घ्यावे, ही विनंती.

* * *

## निवेदन

यष्टी १४ च्या प्रथमावृत्तीत - भक्तिसूत्रे, आगमनविलास व सांख्यसुरेंद्र (पद्य) हे तीनच ग्रंथ होते.

सांख्यावरील इतर ४ ग्रंथ १५, १७ व १८ या यष्टीत अंतर्भूत होते त्यांचा या आवृत्तीत अंतर्भाव केला आहे, हे वाचकांनी लक्षांत घ्यावे ही प्रार्थना !

4

### श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी श्रीबाबाजीमहाराज पंडित यांची प्रथमावृत्तीची प्रस्तावना

# दोन शब्द

विदर्भातील प्रसिद्ध सत्पुरुष श्रीगुलाबराव महाराज यांच्या अप्रकाशित वाङ्मयाचा प्रस्तुत ग्रंथ हा एक भाग आहे. सूक्तिरत्नावली या नांवाने आतांपर्यंत त्यांच्या ग्रंथांचे तेरा भाग प्रसिद्ध झालेच आहेत. त्यांनाच जोडून या ग्रंथाला सूक्तिरत्नावली चतुर्दश यष्टि असें नांव दिले आहे. अप्रकाशित वाङ्मयाचे आणखी पांच तरी भाग होतील असा अंदाज आहे.

कै. शंकरराव सोमवंशी, लोककर्मविभाग नाशिक यांनी हें ग्रंथप्रकाशनाचें कार्य अंगावर घेतलें होते. पण त्यांत त्यांनी पूर्वीच प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांना लोकाकर्षक निरनिराळी नांवें देऊन त्यांची पुनरावृत्ति काढली. अप्रसिद्ध असलेल्या वाङ्मयाला त्यांनी हात लावला नव्हता, पलीकडे हें वाङ्मय ते हातीं घेणारच होतें पण दुर्दैवाने त्यांचे अकालीच निधन झाल्यामुळें त्यांचा तो संकल्प तसाच अपूर्ण राहिला. त्यांनी केलेली श्रीमहाराजांची वाङ्मयीन सेवा अभिनंदनीय होती व त्यांच्याच प्रयत्नामुळें मागील १०-१५ वर्षांत श्रीमहाराजांच्या वाङ्मयाला थोडीफार लोक प्रसिद्धीहि लाभली होती.

कै. शंकरराव सोमवंशी सारखा निष्ठावंत कार्यकर्ता एकाएकी निघून गेल्यामुळें आतां हें कार्य कसें काय पार पडतें हा एक मोठा प्रश्नच होता. पण श्रीमहाराजांच्या प्रेरणेनें कांही व्यक्तींना स्फूर्ति होऊन त्यांनी हें कार्य हातीं घ्यावयाचें ठरविलें. अशा कार्याला लागणारा पैसा याचा आपल्या देशांत भरपूर अभाव असतो हा अनुभव कांहीं नवीन नव्हता. पण असें असतांनाहि त्याकडे विशेष लक्ष न देतां कार्यकर्त्यांनीं भीक व उधारी या दोन सुलभ तत्त्वांचा आश्रय करण्याचे ठरविले व श्रीमहाराजांच्या अप्रकाशित वाङ्मयाचा एक चिटोरादेखील अप्रकाशित म्हणून राहूं द्यावयाचा नाही असा संकल्प केला. हा संकल्प अर्थातच पार पाडणे श्रीमहाराजावरच अवलंबून आहे.

श्रीमहाराजांच्या ग्रंथांविषयीं वाचकांना नव्यानें परिचय करून द्यावयाचा आहे असें नाहीं. त्यांच्या सर्वच ग्रंथांत तर्कशुद्ध विचारसरणी व आत्मानुभव यांचें



अनुपम मीलन झालेलें आहे. याचाच अनुभव प्रस्तुत व पलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांत देखील येईल. मात्र या व पलीकडल्या सर्वच ग्रंथांत एकच त्रुटी वाचकांना जाणवेल व ती म्हणजे यांत आलेला एकही ग्रंथ पूर्ण झालेला नाहीं ही होय. पानांत वाढलेलें पक्वान्न जेवणाऱ्याला अत्यंत आवडून त्याने त्याची मागणी करावी व वाढणाऱ्याने नेमका तोच पदार्थ शिल्लक नसल्याचें सांगावे तसाच थोडाफार प्रकार या ग्रंथांविषयीं झालेला आहे. श्रीमहाराजांचें सर्वच वाङ्मय अत्यंत उच्च कोटीचें असतांना देखील त्याचा व्हावा तसा प्रसार लोकांत होत नसल्याचें कारण लोकांची दिवसेंदिवस वाढत असलेली शास्त्रीय वाङ्मय पराङ्मुखता हें होय. तोंडानें बुद्धिवादाचा अहर्निश जप करणारे विद्वान् देखील तर्कप्रधान विचारसरणीच्या वाऱ्याला उभे राहूं इच्छित नाहींत मग सामान्य जनाविषयीं तर बोलायलाच नको ! इतर कालाप्रमाणेच हाही काळ निघून जाणार हेंहि निश्चितच आहे. त्यामुळे आज जरी नसले तरी भविष्यकाळांत या वाङ्मयाचे आस्वादक राहतील या विषयीं संशय नाही.

प्रस्तुत ग्रंथ लोकासमोर आणण्याचे कामीं ज्या लोकानीं परिश्रम केले त्यांचा नामोल्लेख देखील न करणें कृतघ्नताच म्हणावी लागेल. श्री. रामदास चांदोरकर यांनीं सर्व हस्तलिखितें सुवाच्य अक्षरांत लिहून काढण्याचें परिश्रम केलेत. श्री. दादासाहेब वाचासुंदर, तरुण भारताचे एक निष्ठावान् कार्यकर्ते, यांनी जर छपाईचे कार्य अंगावर घेतले नसते तर ग्रंथ प्रसिद्ध होण्याची कल्पना केवळ हवेंतच राहिली असती. त्याचप्रमाणें विजय प्रेसचे व्यवस्थापक यांनी अत्यंत तत्परतेने छपाईचे काम केले याबद्दल प्रकाशक या सर्वांचा ऋणी आहे. अशाच तऱ्हेचें त्यांचें श्रीमहाराजांवरील प्रेम अमर राहो व इतर राहिलेले ग्रंथ प्रसिद्ध होवोत एवढीच श्रीमहाराजांना प्रार्थना आहे.

ग्रंथाच्या छपाईचे व कागदाचे दर प्रमाणाच्या बाहेर वाढल्यामुळे ग्रंथाचीं किंमत देखील वाढली याबद्दल वाचकही क्षमा करतील अशी आशा आहे.

**– ना.पै.पंडित**

*प्रकाशक*

*पाताळेश्वर रोड,महाल नागपूर*

*डिसेंबर इ.स.१९४९*

*०*

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# नारदीय भक्तिसूत्रभाष्य

(ओवीबद्ध)

**श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य उमा माता शिवः पिता ।**
**पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥१॥**
**पंचायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ।**
**प्रवक्ष्ये भक्तिसूत्राणां रहस्यं देशभाषया ॥२॥**

ओव्या

**ॐनमः श्रीगुरु निष्कलंका । आळंदीवल्लभा विश्वव्यापका ।**
**भक्तवत्सला सुखदायका । ज्ञानेश्वरा ॥१॥**
**जयजय सद्गुरु जननी । मज स्नेहे स्तनपान देऊनि ।**
**हल्लरे चेववी थापटोनी । आघवी निवटोनि अविद्या निद्रा ॥२॥**
**एरवी तूंते नेणता । अंबे स्तवावे कवणीये अर्था ।**
**आणि जो होय जाणता । तरी तो नेणता स्तवनाते ॥३॥**
**निर्गुणीं अथवा सगुणीं । प्रवेशविता वाणी ।**
**प्रमाद होती पक्षी दोन्ही । अंबे स्वरूपीं तुझीया ॥४॥**
**तूं तिन्ही काळीं शुद्ध एक । तुज लावोनि मायेचा संपर्क ।**
**स्वरूपलक्षणें लक्षिता देख । प्रमाद निष्टंक केवि नव्हे ॥५॥**
**असताचिया व्यावृत्ति । सत् म्हणावे तुजप्रति ।**
**जडाचिया समाप्ति । म्हणावे चैतन्य ॥६॥** (य१४-१)
**दुःखनाशे म्हणावे सुख । एवं सापेक्ष स्वरूपलक्षण देख ।**
**अनेकाविण एक । प्रतिष्ठिजे कें ॥७॥**
**''एवं विशेष सामान्य । दोही नातळे चैतन्य ।**
**ते भोगिजे अनन्य । तेणेसी सदा ॥८॥''** ज्ञाने.
**हा तुझा उपदेशु श्रीमंते । नित्य शुद्ध बुद्ध मुक्त कल्पितां तूंते ।**
**आण वाहोनि विसरे येथें । संशयो नाहीं ॥९॥**
**म्हणवोनि स्वरूपलक्षणा । प्रमाद होय तुझिया स्तवना ।**





**आतां रिघालिया तटस्थलक्षणा । तरी स्तवना महा प्रमादू ॥१०॥**
**<u>तिहीं काळीं तुझे ठायीं । विश्व झाल्याची वार्ता नाहीं ।</u>**
**त्या तुज जन्म स्थिति लयीं । कारण बोलती श्रुतिसूत्रें ॥११॥**
**हे असो ज्ञानाचिये दिठी । प्रमाद होय स्तवनाच्या पोटीं ।**
**क्रिया तंव बापुडी पाठी । थांवोचि न धरी ॥१२॥**
**म्हणवोनि भक्तिकांस धरावी । संबंधे बुद्धि भरावी ।**
**तरीही प्रमत्तता करवी । हे घडेचि कीं ॥१३॥**
**<u>लालन</u> संबंध तुझे ठायीं । ठेविता कोमलपणाची नवाई ।**
**तुज भरोनिया हृदयीं । अरुवार भेटे ॥१४॥**
**कमल केसर न कोचंबे । ऐसे पाऊले कीजे उभे ।**
**ते आघवे आटती क्षोभे । लालनदैन्यें ॥१५॥**
**<u>वात्सल्य</u> संबंध ठेवितां तुज । तरी नाना गुण विसरती सहज ।**
**जेऊं घालता विसरे निज । नित्य तृप्ततां ॥१६॥**
**प्रेमे थापटितां आळंदीपति । निद्रा कल्पावी लागे नसती ।**
**माये स्वरूपीं दिवस राती । नाहीं देखिली तुझिया कहीं ॥१७॥**
**<u>माधुर्य</u> संबंध तुजसी लावितां । तरी सकामे आक्रमिता ।**
**तुज अकर्तया कर्ता । अभोक्तया भोक्ता मानणें घडे ॥१८॥**
**नसतेचि लावूनि नाते । तुजसी चाळे करावे भलते ।**
**असो आतां <u>योगपंथे</u> । उठावे जरी ॥१९॥**
**तरी कायी एक करावे । निरोधे आपणा विसरावे ।**
**मग तुज सेवावे । कवणे मार्गे ॥२०॥** (य१४-२)
**म्हणोनि कर्म ज्ञान योग भक्ति । रिघता कोणतीया पंथीं ।**
**अंबे करिता तुझी स्तुति । प्रमाद निश्चिति चुकेना ॥२१॥**
**''म्हणोनी उपनिषदें । दशे येती निंदे ।**
**निंदाचि विशदें । स्तोत्रे होती ॥'' अमृ. अ. ९ ओ. ४९**
**एवं तव उद्गारसौरभे । पसायदानें कोण न लोभे ।**
**म्हणवोनि आम्ही उभे । प्रमादीच ॥२२॥**
**परी आगमिक करुणावंत । तूं आणि हे बोलती संत ।**

**जेणें पावन श्रोत्रपंथ । आकर्णिता जनांचे ॥२३॥**
**''नैवात्मनः प्रभुरयं निजलाभपूर्णो मानं जनादविदुषःकरुणो वृणीते ।**
**यद्यज्ञनो भगवते विदधीत मानं त्ताात्मने प्रतिमुखरस्य यथा मुखश्रीः ॥''**
*(भागवत सप्तम स्कंध अ. ९ श्लो. ११)*
**अर्थ :- विद्यारोपें तटस्थलक्षण । निषेधारोपे स्वरूपलक्षण ।**
**दोन्ही आरोपा अधिष्ठान । द्रष्टा-दृश्यपण वर्जित ॥२४॥**
**तैसे ''दृश्य कां द्रष्टा । या दोन्ही दशा वांझटा'' ।**
**एवं तातवचन वाटा । रिघती वृत्ती ॥२५॥**
**झालियाचे पुसणें । वृथा होय जेणे माने ।**
**म्हणोनि म्हणो एके कोणे । दयाळुपणें प्रभुरावों ॥२६॥**
**''जे स्वामीचिये सत्ता- । विण असो नेणें पतिव्रता ।**
**जियेविण सर्वकर्ता । कांही ना जो'' ॥२७॥ ज्ञाने.**
**म्हणोनि प्रतिभासे विषमे । परमार्थ केवी न गमे ।**
**एरवी सत्ते येऊनी समे । भांडण भ्रमे कवण करी ॥२८॥**
**तदवच्छिन्ने माने एके । दयालुत्वादि विशेखे ।**
**परी नेणेही माने जनाचे निके । पूजाकष्ट नेच्छी देवो ॥२९॥**
**<u>जो जो देवाते अर्पावा मान । तो आपणासचि मिळे संपूर्ण ।</u>**
**जैसे भूषित करिता वदन । प्रतिबिम्ब दर्पणीं पावें शोभा ॥३०॥**
**एरवी प्रतिबिम्बाच्या ठायीं । शोभा करिता नये कही ।**
**तैसे न पूजिता शेषशायी । जीव लवलाही सुखी नव्हे ॥३१॥**
**म्हणाला सत्ताभेदे मुख प्रतिबिम्ब । साधो न दे पूजनगर्भ ।** (य१४-३)
**येथे <u>जीव वृत्तीचि सत्ता स्वयंभ । एक</u> म्हणोनि संदेह वृथा ॥३२॥**
**म्हणोनी बिम्बीं परमार्थभूतीं । स्वाभाविक कृपावंतीं ।**
**<u>मान अर्पिलिया भगवंतीं । जीवाप्रति प्राप्त तो</u> ॥३२॥**
**एरवी तया कृपावंता । नित्यतृप्ता भगवंता ।**
**जनमानाची चाड म्हणता । हांसे संता येईल ॥३४॥**
**अविदुषो येणें पदें बरवे । ज्ञानाभिमानी व्यावर्तिले आघवे ।**
**अभिमानीद्वेषित्वात् इत्यादि मिरवे । पद भक्तिसूत्रीं ॥३५॥**



**म्हणोनी <u>विद्याभिमान । साहो न शके नारायण ।</u>**
**कां जे निरभिमान । करताहि स्तवन प्रमादूचि ॥३६॥**
**कोणत्याहि प्रकारें स्तुती । करीता प्रमादू ये जीवाचिये हाती ।**
**तरी धरोनि निरहंकृति । 'क्षमा याचनें' हेचि उरे ॥३७॥**
**स्तुति करिताहि प्रमाद घडी घडी । तरी क्षमा याचनीच धरावी गोडी ।**
**अभिमानियाकारणें फुडी । अप्रमादता कोठली? ॥३८॥**
**स्तुति करिता निरभिमान । तरी प्रमाद शृंखला दारुण ।**
**मग निंदा करिता साभिमान । अप्रमादपण कासियाचे ॥३९॥**
**म्हणोनिया पुरुषोत्तमा । एक मागणें उरे क्षमा ।**
**कीं वर्णिल्या वाचुनी महिमा । जीवा नाहीं आन गति ॥४०॥**
**कां बोबडिया बोलें याचिल्याविण । शिशूस न वाटे समाधान ।**
**बाळे स्पर्शिता मातृस्तन । तो प्रमाद परी करुणासंपन्न साही माता ॥४१॥**
**भ्रतार आणि बाळ । दोघेही स्पर्शती स्तनयुगल ।**
**परी भ्रतारासी न मिळे जें फळ । तें दीनपणें केवळ लेकरूं पावे ॥४२॥**
**बाळासी प्रमाद स्तनस्पर्शनीं । परी शरण म्हणूनी अनुदिनी ।**
**क्षीर मिळे, ते भ्रतारालागुनी । प्रमादरहित स्तनस्पर्शेही मिळेना ॥४३॥**
**भगवंतीं तंव पक्षी दोन्ही । स्तुति निंदा प्रमादस्थानीं ।**
**मग उगेचि अभिमान धरुनी । कां भवजीवनीं पडावे ॥४४॥**
**गति नाहीं स्तुतिविण । तरी क्षमाची मागावी विनवोन ।**
**अगतीचा गति कृपानिधान । आळंदीरमण जगदात्मा ॥४५॥**
**''येथ जाणीव करी तो नेणें । आथिलेपण मिरवी ते उणे ।** (य१४-४)
**आम्ही जाहलो ऐसे म्हणे । तो कांहींचि नव्हे'' ॥३६८॥**
**''एरवी थोरपण परा सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरीजे ।**
**जगा धाकुटे होईजे । तंव जवळीक माझी'' ॥३७८॥ (ज्ञाने.अ.९)**
**येणें येणें परमात्मप्रेमें । आम्हा रिझविता दवडिली जन्मे ।**
**तेथ उतराई होआवया मनोधर्मे । कल्पिताही नियमे* लज्ज्ञा ॥४६॥** *निश्चये करून
**म्हणोनी स्वामी वर्णनें वा मौनें वंदू । ते उपसाहिजो जी संबंधू ।**
**लीलानुबंधू । संकल्पुनी ॥४७॥**

चहुमुखांचा वर्णितां भागला । पांचा मुखांचा तटस्थ राहिला ।
सहामुखांचा दडाला । कपाटामाजीं जाऊनीं ॥७॥
सहस्त्र मुखांचा वर्णितां देख । तोही जाहला तळी तल्पक ।
थोर थोरासी पडले अटक । एक मुखें काय वर्णू ॥८॥

(हरी विजय अ. ३)

इत्यादि अनुबंधे अनंता । समस्त प्रमाद उपसाही भगवंता ।
तुझे गुण वर्णुनी तुझीया सत्ता । सुख समर्था लाहीन मी ॥४८॥

अभंग

''तुझिये सत्तेनें तुझे गुण गाऊ । तेणें सुखी राहू सर्वकाळ ॥१॥
इत्यादि सुंदर प्राचीन वचनें । सुफळ रचनें मिळो मज ॥२॥
सकळ संबंधी तूंचि नारायणा । आळंदिनिधाना कृपा करी'' ॥३॥

ओवी :-

वाणी मनाचे सार्थक । आपणा क्षमा याचिता सुरेख ।
आतां परी तेथ अकलंक । सावधानता पाहिजे ॥४९॥
प्रमाद करता जाणोनी । क्षमा याचिता अंतरी हांसोनी ।
तरी तो महाप्रमाद म्हणोनी । सदा दीनपणीं तुज नमो ॥५०॥
मज बुद्धिबळ भरवंसा नाहीं । पाठी रक्षावी सद्‌गुरु आई ।
ज्ञानें दोष ठायीं ठायीं । होतील ते निवारी कां ॥५१॥
गुणप्रकाशे अनुमान । साक्षीचे या नांव बोलिजे ज्ञान ।
परी तेही विकल्पेची जाण । नोहे अनुमान यथार्थ ॥५२॥ (य१४-५)
धूम-अग्नीचा सहचार । आधीं प्रत्यक्षे कळलिया साचार ।
मग पर्वतीं वैश्वानर । अनुमानिल्या जाय ॥५३॥
परी अनादि अज्ञान आवरणें । जीव भगवदपरोक्ष सर्वथा नेणें । मग अनुमानी
कवणे गुणें । आणि अर्थापत्ति गणणें तरी नित्य परोक्षता ॥५४॥
यालागीं तुझें चरण । ह्रदयीं धरलियाविण पूर्ण ।
गति मिळे हे विधान । खपुष्पसाधन प्रशंसी ॥५५॥
म्हणोनि अंबे तुझी भक्ति । न कळताहि प्रशंसावी निरुती ।
एक्या नामेहि तुझी स्तुति । पावे पूर्ति निश्चयें ॥५६॥





अज्ञात वस्तु अन्य सत्ता । सम फळ न दे भेटता ।
पिऊनी स्वप्नीच्या अमृता । अमर होता कवण देखो ॥५७॥
परी ज्ञात आणि प्रीतिपूर्ण । वस्तु अन्य सत्तेतही समफळदान ।
भेटलिया करी, येथ उदाहरण । स्वाप्न प्रियदर्शन घेईजे ॥५८॥
विषय तंव समसत्तेतही असूनी । भोक्त्यास दुर्दैवे जाती त्यजुनी ।
आणि सुखवृत्तीही एक स्थानी । न बैसे भोक्त्याची ॥५९॥
तैसा न होसी तूं अनंत । विषमसत्तात्तही कल्पित ।
समफळ देशी कृपावंत । म्हणोनी तुजची अवलंबिजे ॥६०॥
परी अवलंबावया तुझे पाय । पाहिजे तुझी वचन सोय ।
म्हणोनी भक्तिसूत्र पदान्वय । समन्वयें अवलंबिला ॥६१॥
केवळ आपुलिया स्वार्था । हा मम प्रयत्नु नोहे वृथा ।
एरवी गीर्वाण अर्थ समर्था । महापंडिता विज्ञातचि ॥६२॥
आपुलिया चित्ता श्रोता करून । हे मराठीये भक्तिसूत्र विवरण ।
करावे वाटे जीवे करून । ते सिद्धी आळंदिरमणनामें पावो ॥६३॥
मजहूनि अवघेचि थोर । तेथ कवणा सांगू ज्ञानप्रकार ।
रिझवावया नाहीं सुंदर । युक्ति प्रयुक्ति मधुर वाणी ॥६४॥
म्हणोनी आपुलिया मना । माये निरूपीन तुझिया गुणा ।
श्रीआळंदीशा विठ्ठलनंदना । करुणानिधाना ज्ञाननाथा ॥६५॥
कां तुवाचि बोबडिया बोला । उपासाहोनी मज म्हणावे बाळा ।
म्हणोनिही व्याख्यान यत्न केला । अन्यथा नोहे ॥६६॥ (य१४-६)
''छंदोवत् सूत्राणि'' या वचनें । भक्तिमार्गी आधी प्रमाणें ।
शांडिल्याहूनि प्राचीनें । नारदीय सूत्रें ॥६७॥
नारद भगवदवतार होय । एवं आद्यस्कंधीं वचननिश्चय ।
नारदाष्टक जपे व्रजराय । स्कंदपुराणी ही कथा ॥६८॥
तया विषयीं जीवत्ववचन । बोलिजे वासिष्ठीय रामजीवत्वा समान ।
सत्यवक्ता आणि हितकर्ता म्हणोन । म्हणती मूर्खजन कलहप्रिय ॥६९॥
हेहि भारतीं निरूपिलें । वामनें जे नारदा निर्भत्सिले ।
ऐसे जे पुराणीं बोलिले । ते तंव आघवे लीलामात्र ॥७०॥

वराहनृहरिशरभभांडणें । हरिहरस्नेह मोडिला कोण म्हणे ।
कां गौरीगंगेच्या भांडणें । काय देवीपणें विरोधू ॥७१॥
नारद जरी श्रीकृष्ण नसता । तरी कृष्णस्त्री कैसा मागता ।
नारदी झाला ही लीला तत्वता । शिवलिंगभंगासारखी ॥७२॥
जीवधर्माते उद्देशून । कार्यब्रह्म परस्पर निंदिती शिवविष्णुपुराण ।
ते जीव धर्मान्वये नारदी होण । अवतारवचन उपासनार्थ ॥७३॥
जीवधर्मान्वयें करून । नारदासी हे सूत्र शिवानुशासन ।
आणि ईश्वरधर्मे नारद आपण । प्रवक्ता तयाचा ॥७४॥
शारिरीकभाष्यीं आधिकारिक । नारदा आचार्य बोलती देख ।
ते नारायणास ऋषित्व सम्यक । तैसे जाणा ॥७५॥
वेदविरोधी पंचरात्रातें । प्रामाण्य नाहीं बोलिले निरुते ।
कोणी तरी आज्ञा येथें । प्रमाण म्हणुनी ॥७६॥
तथापि जयाचा तया प्रमाण । अभिगमनादि आचार्या मान्य ।
श्रुति स्मृतींत भगवत्प्रणिधान । म्हणोनिया ॥७७॥
जीवोत्पत्ति मान्य नाहीं । परी तैसा अंश सूत्रीं न कांहीं ।
''यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ'' इत्यादि श्रुतिठायीं ।
भक्ति लवलाही बोलिली आहे ॥७८॥
''यं सर्वे देवा नमन्ति मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्चेति'' ।
नृसिंह-तापनीय सांगे ज्ञानोत्तर भक्ति । (य१४-७)
म्हणोनि सूत्रप्रामाण्य निश्चिती । अप्रतिषिद्ध ॥७९॥
एवं भगवद्भक्ता स्वतंत्रत्वे । धर्माग्रहीया वेदोपजीवीत्वे ।
भक्तिसूत्रें प्रमाणत्वें । उपकारकही ॥८०॥
तयाचे रहस्य मराठी । हृदया कळावे आवडी मोठी ।
म्हणोनि आपणाचिसाठीं । आरंभिला बोलूं ॥८१॥
भूचरी मुद्रेमाजी आपुलिया । तनुध्यानें मार्ग कळे साविया ।
तेवि रिझवीन हृदया । हृदयविचारें ॥८२॥
या समर्थ सूत्राचें धरितां बळ । तरी मानस पिशाच केतुले चपळ ।
सांडुनि आपला स्वभाव सकळ । सत्त्वें निखळ जाहले श्रोते ॥८३॥





आतां हृदय कमळमग्ना । नमोनिया मनमोहना ।
ज्ञानेश्वरकन्यका म्हणे मना । भक्तिसूत्र विवरणा परिसावे ॥८४॥
तेथ हें पहिलें सूत्र । जे शास्त्रांचें बिढार ।
ऐकावे समस्त विकार । सांडोनिया ॥८५॥

## अथातो भक्तिं व्याख्यास्यामः ॥१॥

(अधिकरण)

अथ म्हणजे मंगळ । उदाहरणमात्रेची केवळ ।
अर्थ पाहतां सोज्वळ । आरंभ अधिकार आनंतर्य ॥८६॥
भगवद्भक्ता कहीं । अमंगळस्पर्शू नाहीं ।
तयाचे शेषशायी । सकळ जे करी ॥८७॥
''आणि जेव्हांची कां भक्ति । दिधली आपुली चित्तवृत्ति ।
तेव्हांचि मज सूति । त्यांचिये नाटी ॥९५॥
पै रंक एक आडलेपणें । काकुळती धांव गा धांव म्हणे ।
तरी तयाचिये ग्लानी धांवणे । काय न घडे मज ॥१२८॥
आणि भक्ता ही तेचि दशा । तरी भक्तीचा सोस कासया ।
म्हणऊनि हा ध्वनि ऐसा । न वाखाणावा ॥१२९॥''(ज्ञा.अ.१२)

(ज्ञा.अ.८श्लो.१५)

'आधी चित्त समर्पण । करूं मंगळाचरण' इत्यादि तात आणि तुकारामवचन।
अमंगळाचे नायके स्वप्न । भक्तजनमन सर्वथा ॥८८॥

भागवत श्लोक -

''त्वां सेवतां सुरकृता बहवोऽन्तरायाः
स्वौको विलंघ्य परमं व्रजतां पदं ते ।
नान्यस्य बर्हिषि बलीन् ददता स्वभागान्
धत्ते पदं त्वमविता यदि विघ्नमूर्ध्नि ॥१०॥''

(स्कंध११.अ.४)

(य१४-८) इत्यादि श्लोकीं भागवतीं । भगवद्भक्ता सुर छळिती ।
बोलिले परी ते गौणीविषयीं निश्चिती । पराभक्तींत कदा नव्हे ॥८९॥

किंवा देवांचीया मती । विघ्नें करूं धांवती । या अर्थींच रूढ श्लोकोक्ति ।
परी विघ्न भगवद्भक्ता स्पर्शिती, हा अर्थु न निघे ॥९०॥
म्हणवोनि तया समर्था । नाहीं अमंगळाची चिंता ।
तेथ उ्रारणमात्रेचि समस्ता । मंगळ होय ॥९१॥
आतां भक्तीचा आरंभ एक । हेही म्हणणें अस्वाभाविक ।
असाध्य वस्तूशीं सम्यक । आरंभ नाहीं ॥९२॥
साधनांचें फळ । भक्ति नोहे केवळ ।
वस्तुतंत्र उमाळ । पाहिजे प्रेमाचा ॥९३॥

श्रीतुकारामांचा अभंग -

सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरु ॥१॥
परी या दुर्लभ विठोबाचे पाय । तेथें हें उपाय न सरती ॥२॥
अमृतें सागर भरवती गंगा । म्हणवेल उगा राहे काळा ॥३॥
भूत भविष्य कळो येईल वर्तमान । करवती प्रसन्न रिद्धि सिद्धि ॥४॥
स्थान मान कळो येती योग मुद्रा । नेववेल वारा ब्रह्माण्डासी ॥५॥
तुका म्हणे मोक्ष राहे ऐलीकडे । इतर बापुडे काय तेथे ॥६॥'अभंग २९१५
इत्यादि समर्थवचनीं । असाध्य भक्ति गायली जनीं ।
आणि श्रुति स्मृति पुराणीं । तैसेचि बोलिले ॥९४॥
एरवी तरी सत्ता । जैसी उघड सर्वथा ।
तैसी प्रीती ही तत्वता । उघडचि आहे ॥९६॥
जरी अन्य जाहली । तरी भूतीं नाहीं तुटली ।
म्हणोनीही वहिली । असाध्य भक्ति ॥९६॥
आतां कर्म योग ज्ञाना । भक्तिविणें उगी वल्गना ।
अन्वयें व्यतिरेकें वचना । घेऊनि सांगू ॥९७॥
आरंभी केशव नारायण । हे अवघेचि जाणती ब्राह्मण ।
स्मृतीहि सांगे आपण । क्रिया परिपूर्ण हरिनामें ॥९८॥

श्लोक

''यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपो यज्ञक्रियादिषु ।
न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम् ॥''



(य१४-९)

अर्थ :- याची केलिया आठवण । किंवा केलिया नामस्मरण ।
न्यून ते होय संपूर्ण । तया नमन अच्युताते ॥९९॥
तप यज्ञ आणि क्रिया । ही आघवी अहंकारचर्या ।
परी जयाचिया पाया । स्मरता माया निवारी ॥१००॥
एवं कर्माच्या ठायीं । भगवद्भक्तीची अपेक्षा पाही ।
आतां योगाच्या ठायीं । भक्ति लवलाही व्यापकू ॥१०१॥
''ईश्वरप्रणिधानाद्वा'' इत्यादि सूत्रेंकरून ।
'ईश्वरप्रसादाज्ञितोत्तरभूमिकस्य नाधरभूमिषु संयमो युक्तः'

(योगसूत्र ३.६)

इत्यादि व्यासभाष्य वचन । योगिया गती भगवत्प्रणिधान ।
आणि कूर्म पुराणही प्रमाण येथ ॥१०२॥
क्लेश कर्म विपाकाशय । या वेगळा पुरुष होय ।
ऐसिया ध्यानाविण स्वये । शून्य ध्यान नोहे योगसिद्धिद ॥१०३॥
शून्यध्यान मात्र जेथ । आपुलाचि प्रयत्न एक तेथ ।
विघ्न वारावया साहाय समर्थ । कोणीचि नोहे ॥१०४॥
म्हणोनि कौर्मी ईश्वरगीते माझारीं । स्वयें बोलिले त्रिपुरारी ।
की अभाव-योगाहूनि थोरी । ईश्वरध्यानयुक्त महायोगाची ॥१०५॥
स्वयें बोलिले भगवंत । बारावे अध्यायीं कृपावंत ।
कीं निर्गुणोपासका क्लेश बहुत । सगुणभक्त सदा सुखी ॥१०६॥
''योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।
श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥४७॥''

(गीता अ.६ / ४७)

सकळ योगियांत मुकुटमणी । जो विश्वासें विनटला माझिये भजनीं ।
तो मज आवडता गाण्डीवपाणी । बोलिले देवो ॥१०७॥
विश्वासाचेनि बळे । अंतरीचे प्रेम सगळे ।
भोगीत असता बाहेरी पघळे । तेणें व्युत्थानीं सोहळे समाधीचें ॥१०८॥
एवं योगाचियाही ठायीं । भक्तिवाचूनि गति नाहीं ।

**आता ब्रह्मज्ञानही । भक्ति लवलाही अपेक्षितु ॥१०९॥**
**"ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।**
**समः सर्वेषु भूतेषु भद्भक्तिं लभते पराम् ॥५४॥ गीता.अ.१८** (य१४-१०)
**ब्रह्मज्ञानें ब्रह्म जाहला । योगें इंद्रियमननिरोधें प्रसन्न वहिला । आणि वैराग्यें**
**हर्षशोकापासुनी सूटला । तो माझिया पराभक्तीला अधिकारी ॥११०॥**
**एवं अन्वयें कर्म-योग-ज्ञानीं । भक्त्यपेक्षा बोलिली वाणी ।**
**आतां व्यतिरेकही तिही स्थानीं । ऐके मना ॥१११॥**

**श्लोक**

**"धर्मः स्वनुष्ठितः पुसां विष्वक्सेनकथासु यः ।**
**नोत्पादयेद्यदि रतिं श्रम एव हि केवलम् ॥८॥**
(भाग.स्कंध१.अ.२)
**"धर्मः सत्यदयापेतो विद्या वा तपसान्विता ।**
**मद्भक्त्यापेतमात्मानं न सम्यक् प्रपुनाति हि"॥२२॥**
(भाग.स्कं.११.अ.१४)

अर्थ - **धर्म केलिया नाना रीती । आणि भगवंती न वाढवी रति ।**
**तरी सुज्ञ तया अधर्म म्हणती । जेणें कर्तृत्व भ्रांति आत्मरूपीं ॥११२॥**
**अहो अधर्मी जे होती । ते इह लोकीं सुख भोगिती ।**
**परी भक्तिरहित जे धर्म करिती । तया येथ श्रम परत्र दुःख ॥११३॥**
**एवं भक्तिरहित बाह्य कर्म । ते आघवेचि नव्हे उत्तम ।**
**आतां भक्तिरहित मानस धर्म । यम नियम तेही वृथा ॥११४॥**
**सत्य आणि दया । विद्या का तप मिसळलिया ।**
**एक माझी भक्ति नसलिया । जाय वाया आघवा धर्मू ॥११५॥**
**कृष्णप्राप्तिविण तप । शरीर शोषणादि अमूप ।**
**तो पूर्वादृष्टें भोगी पाप । नाना संकल्प वाढवोनि ॥११६॥**
**कृष्णप्राप्तिविण जे दया । त्याचेच नांव मोह मनोराया ।**
**कायसी पुत्रावरी दया । न करिसी संसारी ॥११७॥**
**श्रीकृष्णाविण सत्य भाषण । जैसे चोराचे शपथ करण ।**
**परस्परांत मेळ व्हावा म्हणोन । एरवी फळ कांहीं नाहीं ॥११८॥**



**अथवा वेदानुसार जरी हे केले । जरी स्वर्गही फळ झाले ।**
**तरी भक्तिवांचुनि नाहीं केले । यथार्थ पावन कोणीहीं ॥११९॥**
**एवं भक्ति वांचुनि व्यर्थ कर्म । हे व्यतिरेकें बोलिले परम ।**
**जरी संक्षेपशारीरिकीं मानस धर्म । भगवदर्पण नाहीं बोलिले ॥१२०॥**
(य१४-११) **तरी भगवदर्थ ते असतां । तेव्हांचि तयाची सार्थकता ।**
**एरवीं पशूंच्या आंगी तत्वता । काय नीति नसे ॥१२१॥**
**चातक सदा वैराग्य संपन्न । वृक्ष सदा परोपकारी पूर्ण ।**
**तेही तरावेत भक्तिवीण । जरी होईल प्रमाण अनीश्वर धर्मू ॥१२२॥**
**आता <u>भक्तिवांचोनी योग । याचेची नांव महारोग ।</u>**
**हेही बोलिले श्रीरंग । मुचकुंदासी निजमुखे ॥१२३॥**

श्लोक

**"युंजानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मनः ।**
**अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम् ॥६१॥"**
(भाग.स्कंध १०.अ.५१)

**अर्थ :-**

**राया माझिया भक्तिवीण । प्राणायामादिकीं निरोधलिया मन ।**
**आत्मस्वरूपीं लाविलीया बळें करून । पावे व्युत्थान वासनावशें ॥१२४॥**
**अरे नपुंसक काय ब्रह्मचारी । कीं मंदाग्नि काय निराहारी ।**
**पोहणार वायु कोंडोंनि उदरीं । कैसे होती महामुनि ॥१२५॥**
**मजवांचोनि कांहीं । आ-कैवल्य जया नाहीं ।**
**तेचि वासनारहित हृदयीं । येर भवडोहीं बुडाले ॥१२६॥**
**<u>जैसे विषमिश्रित उत्तमान्न । तैसे वासना मिश्रित आघवे साधन ।</u>**
**<u>आरंभिताचि संशय दारूण । मग फळ संपन्न कासयाचे ॥१२७॥</u>**
**भक्तिवाचोनि फळेल योग । तरी मुक्त होईल अवघे जग ।**
**कामी पुरुष ही अव्यंग । धरिती कामिनी-अंग समाधींत ॥१२८॥**
**भक्तिवाचोनि ज्ञान । वृथा होईल ऋषीवचन ।**
**शास्त्र बाहु उभारून । बोलतु असे ॥१२९॥**

श्लोक

''नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं न शोभते ज्ञानमलं निरंजनम् ।
कुतः पुनः शश्वदभद्रमीश्वरे न चार्पितं कर्म यदप्यकारणम् ॥''

अर्थ :-

भगवद्भक्तिविरहित । ब्रह्मज्ञान क्रियावर्जित ।
जाहलियाही मुक्त । शोभा न पावे ॥१३०॥
जे सदा उपजवी अहंकार । ऐसे कर्म जरी निष्काम समग्र ।
तरी ईश्वरार्पणाविण साचार । शोभा केवि पावेल ॥१३१॥
एवं व्यतिरेके पाहतां । भगवद्भक्तीची ही व्यवस्था ।
आतां सकळासी मूळ तत्त्वता । भक्तिचि एक ॥१३२॥ (य१४-१२)

श्लोक

''वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः ।
जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यत्तदहैतुकम् ॥''

अर्थ :-

भगवंतांच्या ठायीं । दृढ भक्ति ठेविलीया पाही ।
वैराग्य होय गुणीं विषयी । इच्छा नसतांही उपजे ज्ञान ॥१३३॥
ज्ञान स्वभावे प्रकाश । ते इच्छेविण उपजे येथ कवण विशेष ।
परी भक्ति वांचोनि तयास । शोभाचि नये ॥१३४॥
म्हणाल ज्ञान वाक्याधीन । तरी यथोपाधिनिवर्तकवाक्यही सद्‌गुरुभक्त्यधीन ।
किंवा भगद्भक्तिविण । सामान्यज्ञानें आनंदू नव्हे ॥१३५॥

श्लोक

येन्येरविंदाक्षविमुक्तमानिनस्त्वय्यस्तभावादविशुद्धबुद्धयः ।
आरुह्य कृच्छ्रेण परं पदं ततः पतन्त्यधोऽनादृतयुष्मदंघ्रयः॥३२॥''

(भाग.स्कंध१०.अ.२)

अर्थ :- देव म्हणती कमललोचना । न भजतां तुझिया चरणा ।
देहाभिमानचि आत्मपणा । नेवोनि मुक्तपणा मानती शब्दें ॥१३६॥
मी विष्णुदत्त झालो मुक्त । ऐसा नामरूपाभिमान उभारिती तेथ ।
नामावच्छिन्न मोक्षताहंकृत । धरील्याविण निषेधू न घडे ॥१३७॥



म्हणवोनि तयाप्रति । अणुमात्र नसे तुझी संविती ।
वादे बुद्धी ही निश्चिती । अशुद्ध जयांची ॥१३८॥
नाहीं तुझें ठायीं प्रेम । तेणें विषयींही वाढे काम ।
आणि शब्दपांडित्य करणें परम । अभिमान मात्र वाढवी ॥१३९॥
किंवा विवेक जरी जाहला । नामरूपाभिमान जरी सुटला ।
तरी पुरुषबाहुल्यादि सांख्य धर्म तयाला । न सोडिती ॥१४०॥
म्हणोनि असंग तितुक्या पुरता । तो होय भगवंता ।
तेणें वासनाक्षयें मोक्षपथा । गेलाचि होय ॥१४१॥
परी तुझिया भक्तिविण । नुपजे सर्वात्मप्रेम पूर्ण ।
म्हणोनि पुनः होय पतन । मायावर्ती तयाचे ॥१४२॥

श्लोक

''तथा न ते माधव तावकाः क्वचित्
भ्रश्यन्ति मार्गात् त्वयि बद्धसौहृदाः ।
त्वयाभिगुप्ता विचरन्ति निर्भया
विनायकानीकपमूर्द्धसु प्रभो'' ॥ भागवत.

तैसे न होती तुझे दास । जयास केवळ तुझीच आस । (य१४-१३)
संसारी सर्वदा उदास । निर्दोष यश गाती तुझे ॥१४३॥
ते तुझिये समाधींत स्वयें विदेही । मग तूंचि आवेशे तयांचे देहीं ।
क्रिया करिशी सर्वही । दयाघना ॥१४४॥
आणि तयाचे न नाशे ज्ञान । पिशाच सम तम नाहीं म्हणोन ।
हाचि दंश निदर्शन । विश्वनाथ पंडितही करिती ॥१४५॥

श्लोक

''अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥२९॥''

(गीता अ.९)

अर्थ :-

जे मजवाचोनि इतर नेणती । माझी समाधी दिवस राती ।
भोगिती तयाच्या देहीं मी श्रीपति । आवेश भोग क्षेम करी सर्व ॥१४६॥

तया अप्राप्ता पुरवी । प्राप्ता चोर नुरवी ।
तयाची आशा पुरवी । आघवी ऊर्वी भरोनि ॥१४७॥
ऐसे स्वये बोलिलास देवा । म्हणोनि निर्भय भक्तिठेवा ।
लागला तयाचा तया भवगोवा । ठेवणें नांवा विटाळू ॥१४८॥
भगवद्भक्ता येतां विघ्न । विघ्ना पाठीं पोटीं तूं भगवान ।
यालागी तुवा रक्षिले भक्तजन । ते निर्भय पूर्ण विचरति ॥१४९॥
'विपुल' गुरुमायेचे शरीरीं प्रवेशला । इंद्राकडे जावे वाटे तिजला ।
परी अवयवा सकळा । बांधिले तेणें ॥१५०॥
महाभारतीं ही कथा । अभिप्राय कीं गुरुमायेचे ज्ञान न नाशिता ।
कायाप्रवेश झाला करितां । विपुल सच्छिष्य ॥१५१॥
तरी मग ज्ञान न नाशिता भक्तांचे । कायावेशें करी काम त्याचे ।
येथ कांहीं संशयांचे । कारणचि नाहीं ॥१५२॥

प्रेमरसायने -

''नित्यसमाधियुक्तानां गोपीनां व्यवहारनिष्पत्तिर्भगवतैव परमकारुणिकेन निर्वाह्यते ।''

तासु भूतावेशन्यायेन प्रवेशोपगमात् । न चात्र मानाभावः ।''

श्लोक

नित्यमेव निमग्नास्ताः कृष्णप्रेमसमाधिषु ।
न कदापि वियुज्यन्ते गोप्यो विरहभीरवः ॥

(प्रथमलक्षणखंड श्लोक ६७)

सत्त्वं न चेद्धातरिदं निजं भवेद्विज्ञानमज्ञानभिदापमार्जनम् ।
गुणप्रकाशैरनुमीयते भवान् प्रकाशते यस्य च येन वा गुणः''

(भागवत स्कंध १० अ. २ श्लो. ३५)

(य१४-१४) पांच इंद्रिये कां त्रिगुण । ययाच्या प्रकाशावरून ।
तुज सर्व साक्षित्वाचे अनुमान । भक्तिरहित विवेकी जन करिती ॥१५३॥
परी येथ अनुमान म्हणतां । हांसे येईल तार्किकचित्ता ।
अनुमानासी सहचार तत्वता । प्रत्यक्ष पाहिजे ॥१५४॥
अग्नि धूम देखिल्याविण । पर्वतीं अग्नीचे धूमावरून ।



करितां नयेचि अनुमान । निश्चयो जाण हा एक ॥१५५॥
परी दार्ष्टान्तीं विपर्ययो । जोवरी मी मानी देहो ।
आणि आवरणें भरला जीवो । तोवरी अपरोक्ष ज्ञान नोहे ॥१५६॥
अपरोक्ष ज्ञान सहचाराविण । वृथा होईल गुण प्रकाशानुमान ।
नित्यानुमेय म्हणता जाण । तरी येथ युक्तिविण वचन साह्य ॥१५७॥
वचन सहाय जरी घेयावे । तरी सांख्यास कां रक्षावे ।
श्रुतीतें उपेक्षावे । हें कोण ज्ञान ॥१५८॥
म्हणोनि अनध्यस्तविवर्त हे स्वरूप । न पावता दृष्टिपंथ ।
तरी ब्रह्मज्ञान तेथ । कायीसे होय ॥१५९॥
अहो मनुष्यदेह जाहला । आणि सद्गुरुत्वे नाश्रयिला ।
तरी मुक्तिपंथे नेला । कवण तेणें ॥१६०॥
एरवी तुझेनि वचनें । वृत्तिया आत्माकार होणें ।
नातरी कोण्या अनुमानें । पाविजेल तेथ ॥१६१॥
वचनमात्रें बाळाते । विश्वासें एके चित्ते ।
पावविणें माते । जेवि घडे ॥१६२॥
तेवी कृपामात्र वचनें । होय ते येणें मानें ।
आणि निष्ठादृष्टि देखणें । तें निष्ठाचि भरे ॥१६३॥
कां विश्वरूपादि दर्शनें । तुझीये लहानसे तनुगुणें ।
एवढे जैं देखणें । तैं भवा मानणें ब्रह्मबिंदु ॥१६४॥
किंवा ज्ञान तें अनुमानमात्र राहे । प्रेमाचा स्पर्शू नोहे ।
तेणें आनंद सोय । न सांपडें ॥१६५॥
एरवी अनुमानाच्या कोटी । हेतुसाध्यदृष्टान्तपोटीं ।
नित्य भेदाची परिपाटी । तेणे आटाआटी चुकेना ॥१६६॥
भेदेचि अनुमानावे निर्गुण । आणि तेथ भोगावा शीण ।
तरी होका भेदे सगुण । भजता निर्गुण प्रेममय ॥१६७॥ (य१४-१५)
निर्गुणीं पावले सगुणीं भजता । एवं हरिपाठ स्फुरण एकनाथा ।
साकार निराकारीं तत्वता । भेदू न घडे ॥६८॥
मायाकार्य भगवच्छरीर । हे 'प्रेमनिकुंजी' खंडिले समग्र ।

कीं माया नोहे दृष्टिगोचर । भूतकार्य झाल्याविण ॥१६९॥
अघटितघटनापटु मायेस म्हणता । तरी स्वातंत्र्ये येणें सांख्यजडमता ।
पारतंत्र्ये अघटितघटनापटुता ।
तरी अघटितघटनापटु ब्रह्म म्हणता कवण दोषू ॥१७०॥
द्वैत न होवावे म्हणून । मायेचे अंगीकरण ।
अविकारता ब्रह्माकारण । सांगावया इष्टचि ॥१७१॥
येथेंही विकारता न यावी । आणि मायाकार्ये तुच्छ नोहावी ।
म्हणोनि तदवच्छेदे बरवी । अनध्यस्तविवर्त भगवत्तनु ॥१७२॥
बिम्बीं सत्यसंकल्पत्वादिक । ते बिम्बचि तदाकारक ।
हें अनध्यस्तविवर्तक । स्वरूप बोलिजे ॥१७३॥
एवं देवाचेनि वचनें । सकळासी मूळ भक्ति म्हणणें ।
तें बोलिजेल अनुगुणें । हृत्प्रवेशार्थ ॥१७४॥
ननु प्रेमस्वरूप अनिर्वाच्य । तें केवि होईल वाच्य ।
तरी ब्रह्मस्वरूपहि अनिर्वाच्य । आणि होय वाच्य महावाक्यें ॥१७५॥
तैसे प्रेमहि अनिर्वाच्य एक । परी प्रेमोद्गारेचि वाच्य देख ।
प्रेम असलियाविण  सुरेख । गुणगान नव्हे म्हणोनि ॥१७६॥
ज्ञान असतां वाच्य ज्ञान । प्रेम असतांचि वाच्य गुण ।
येणेंचि अनिर्वाच्य व्याख्यान । जैसे कैसे घडो शके ॥१७७॥
शत कोटी शब्द सांगतां । कवणा नोहे ब्रह्मता ।
कवणा एके शब्देचि तथा । स्फुरो लागे ॥१७८॥
येथ कर्मचि जरी कारण । तरी कर्मांही शब्द साधन ।
म्हणोनि शब्द ज्याचेनि प्रमाण । तो भगवंत पूर्ण प्रसाददाता ॥१७९॥
तेणें भगवत्प्रसादे सकळ । लाभ होय अळुमाळ ।
प्रेम व्याख्यानहि केवळ । तैसेचि आहे ॥१८९॥
एवं प्रथम सूत्री निरूपिले । भक्ति ग्राह्यत्व बोलिले ।
व्याख्यानचि उपयोगिले । निश्चये येथ ॥१८१॥ (य१४-१६)
व्याख्यास्यामः इति । म्हणावयाचे कारण निश्चिति ।
कीं हे भगवत्कीर्तन भक्ति । एर नाहीं ॥१८२॥



ज्ञान वाक्यानुस्युत । नोहेचि गा यथार्थ ।
ते वाक्यें उपजत । म्हणोनिया ॥१८३॥
येथ तंव व्याख्यान । नोहे भक्तीचे कारण ।
भक्तिचि कीर्तन । म्हणोनिया ॥१८४॥
यद्यपि कीर्तन गौणी भक्ति । नवविधा-निविष्ट म्हणती ।
तथापि गौणी-परात्व येणें उक्ति । प्रकारान्तरे ॥१८५॥
कर्तव्यत्वेंकरून । नवविधेस गौणीपण ।
प्रेम बिढारे होती उद्गीर्ण । तरी पराही ते ॥१८६॥
येथ शतावधि विरोधोक्ति । प्रेमोद्भवा उपयोगा येती ।
जैशा नाना प्रक्रिया वेदान्तीं । ब्रह्मबोधोपयोगी ॥१८७॥
म्हणोनि तेणें व्याख्याने । कीर्तनी देहें ब्रह्मरूप होणे ।
आणि आणिका श्रवणें । करणे चित्ते ॥१८८॥
अध्ययन अध्यापन । आघविया गुरुशिष्यपण ।
एकी एका लोटांगण । निरभिमान सहज सुखे ॥१८९॥
एवं प्रथम सूत्राभिप्रावो । साच बोलवी आळंदीरावो ।
आतां द्वितीय सूत्राभिप्रावो । परीसाहो महाजन ॥१९०॥

०००

## द्वितीय सूत्राभिप्राय

जय जय सद्गुरु सुादिनंदा । जय जय सद्गुरु परम अभेदा ।
जय जय सद्गुरु जगदांकुरकंदा । आळंदीपते ॥१॥
कवणें एके गुणें । तुम्हा स्तवितां धीटपणें ।
तो प्रमादहि तेणें । क्षमाचि होय ॥२॥
नवल तुमची दयागरीमा । प्रमादें प्रमाद होय क्षमा ।
म्हणोनि विवाद पुरुषोत्तमा । अनुपपन्न ॥३॥
अहो तुमचे करावया स्तवन । तुम्हासम आहे कवण ।
म्हणोनि वर्णिता चुकती गुण । तेणें प्रमादपण सहजचि ॥४॥
परी प्रमादेंचि तुमची प्राप्ति । होये यालागीं तुम्ही दयामूर्ति । आतां ‘देव

दयाळु असता तरी, तारावी अवघी क्षिती'। इत्यादि उक्ती अचर्चाते ॥५॥
प्रमादेंहि कांहीं एक । क्षमा करणेंचि सम्यक ।
उद्धरिता इतर प्रमादी अनेक । तरी जड सकळीक होती जीव ॥६॥(य१४१७)
जडाते उद्धारसौख्य नाहीं । आणि चेतनाते स्वप्रवृत्तिविण उद्धार नाहीं ।
म्हणोनि आपुला संकोच फणीशायी । दयाळुपणें दाखवितु ॥७॥
येथ स्वभावतंत्र ईश्वर घडो । ऐसे म्हणतां जिव्हा झडो ।
चेतनाविण जडकृति नुघडो । हे ईश्वरतंत्र स्वभावता ॥८॥
किंवा दयेचें मुख्य लक्षण । यथा भावना तथा भवन ।
ते परमेश्वरीं आहे म्हणून । कृपानिधान कृपाळु ॥९॥
अथवा जे संसारिक । ते मोक्षहि न मानिती अधिक ।
तया बळें उद्धरता होय दुःख । म्हणोनिही आक्षेप अघटमान ॥१०॥
दया होय दीनावरी । दीन नोहे संसारी ।
म्हणोनिहीं परमेश्वरीं । न घडे शंका ॥११॥
एवं सर्वसामर्थ्ये आक्षेप केला । तरी जीव स्वतंत्र ठेवावयाला ।
निज सामर्थ्य संकोच केला । दयाळुपणें भगवंते ॥१२॥
जैसे यशोदे घरीं । दही लोणी मागें करी ।
आपुले दैविक सामर्थ्य अंतरीं । झांकोनिया ॥१३॥
असो हे आक्षेपादि समस्त । वर्णनहि प्रमाद येथ ।
तरी जितुके दिधले तितुक्यांत । आम्ही संतुष्ट असावे ॥१४॥
एरवी यांचा विचार स्वमतीं । केला आहे अन्य ग्रंथीं ।
ऐसिया भगवंतीं ठेवणें प्रीति । या नांव भक्ति सदभिमत ॥१५॥
तंव एक शुष्क वेदान्ती उठला । म्हणे मायायुक्त परमेश्वराला ।
बहु मानिता कैसा जाहला । भक्तिमंत तो ॥१६॥
तंव सिद्धान्ती म्हणे अहा । हें ज्ञानाचें वैभव पहा ।
चैतन्यासहित मायेचा हा । निषेधू करी ॥१७॥
जीवासी ज्ञान झालिया । अविरुद्ध प्रारब्ध तया ।
ते भोगितां लाज न वाटे यया । ईश्वरा अविरुद्ध माया आक्षेपी ॥१८॥
तत्त्वज्ञानी गुरु प्रारब्धाविरोधे ब्रह्माकारू । शिष्यासी उपास्य होय निर्धारू ।





तरी शुद्ध सत्त्व मायानुकूल परमेश्वरू । अनुपास्य कां ॥१९॥

प्रेम आणि अवगुण

एरवी तरी प्रेमाचे लक्षण । प्रियाचे न दिसती अवगुण । (य१४-१८)
जयांचे विषयप्रेमे आंधळे नयन । ते विषयांतील अवगुण काय पाहती ॥२०॥
तेविं परमेश्वरीं प्रेमा धरितां । तरी अवगुणी माया न भासे सर्वथा ।
प्रेमाचा स्वभावचि तत्वता । प्रियाचे अवगुण न दिसती ॥२१॥
अवगुणी माया देवाचे ठायी । हे भक्तासी न भासे कांहीं ।
भक्तांचे अवगुण शेषशायी । कल्पांतीही निरखेना ॥२२॥
अहो माया आहे म्हणून । जीवाची अविद्या क्षमा करी भगवान ।
जो आपुला न पाहे अवगुण । तयाचा अवगुण आपण केवि पहावा? ॥२३॥
एवं माया मानोनी भगवंता । आम्ही समाधान केले तत्वता ।
कीं दुर्जनतोषन्यायें वेदान्त्या । भक्ति आवडो म्हणोनी ॥२४॥
झणी म्हणाल माया नीच । तरी ब्रह्म कां जाहले उ्च ।
माया बंधक म्हणोनी म्हणाल नीच । आणि ब्रह्म उ्च मोक्षदायक म्हणूनी ॥२५॥
तरी बंध मोक्ष दोन्ही । मायाकल्पित हे वेदान्तवाणी ।
मग उ्चनीचत्वे स्थानी । मायेच्याची ॥२६॥
आणि ब्रह्म अविद्येसही आधार । तरी तेचि नीच होईल साचार ।
म्हणोनी शुद्धसात्विक परमेश्वर । करुणाकर सेवावा ॥२७॥
एरवी प्रतिभास-परमार्थसत्ता । दोहोंत परस्पर नाहीं उ्चनीचता ।
अविरोधे लीलामात्रता । सुखसंपन्नता सर्वत्र ॥२८॥
आतां मधुराऽद्वैतीं । मायास्पर्शू नाहीं भगवंतीं । प्रतिबिम्बापेक्षिक
बिंबत्वारोपावच्छिन्नबिम्बभूतीं । मायोपहिती करुणार्णवीं ॥२९॥
जोवरी दृढ देहभाव । तोवरी द्वैताचा अहंभाव ।
परी पूजावया माधव । समचि प्रेम ॥३०॥
जेव्हां जीवबुद्धी बळकावे । तै अंशाभिमान स्वभावें ।
परी देवासी सेवावे । हे सम प्रेमचि ॥३१॥
आत्मबुद्धीनें अद्वैत । परी जीवन्मुक्तींत भगवंत ।
सहज सेवावा आवडत । आपणा आपणांत साक्षिपणे ॥३२॥

म्हणौनि द्वैत विशिष्टाद्वैत अद्वैत । हे ज्ञानाभिमानाचे चाळे समस्त ।
सेव्य मात्र भगवंत । नंदतनय कनवाळू ॥३३॥ (य१४-१९)
एवं कवणेहि परी । भगवंताची आवडी पुरी ।
बोलिली आहे ब्रह्मकुमरी । भगवद्भक्ती ॥३४॥
तंव पुनः एक वेदान्ती । उठोनि म्हणे नाहीं संमति ।
शुद्ध आत्मप्रेम सांगे श्रुति । त्याविण भगवद्भक्ति गौण सांगे ॥३५॥
श्रुति :-
'न वा अरे ब्रह्मणः कामाय ब्रह्म प्रियं भवति ।
आत्मनस्तु कामाय ब्रह्म प्रियं भवति ।
न वा अरे देवानां कामाय देवाः प्रिया भवन्ति ।
आत्मनस्तु कामाय देवाः प्रिया भवन्ति ।''
(बृहदारण्यक अ. ४ ब्राह्मण ५ आणि ६)
सिद्धान्ति म्हणे या श्रुती । तुज पाठ हे कळले मजप्रति ।
परी अर्थाविण वाचिता पोथी । घाणा रगडिती तैसे ते ॥३६॥
या श्रुतीचे येथ कांहीं । भगवत्पूज्यपादभाष्य नाहीं ।
आणि वार्तिक तेही । तैसेचि आहे ॥३७॥
आत्मपुराणीं शंकरानंद । ब्रह्म शब्दाचा अर्थ विशद ।
ब्राह्मणजाति करिति प्रसिद्ध । आणि काकारामहि तट्टीकेंत ॥३८॥
म्हणोनी येथील ब्रह्म शब्दाच्या ईश्वरार्थी । नाही व्याख्यानजन्य प्रतिपत्ति ।
यालागी न म्हणवे भगवद्भक्ति । गौण आत्मप्रीतीहूनि ॥३९॥
श्रुतीत देवा हे बहुवचन । यालागी येथ देवता बोलिल्या ईश्वरभिन्न ।
परमेश्वरप्रीतिनिषेधन । नाहीं केले या ठायी ॥४०॥
पुनः इया श्रुती । आत्मव्यतिरिक्त भोग्य निषेधिती ।
भोक्ता आत्मा प्रतिपादिती । परी साक्षि-आत्मप्रीति याहोनि उ्ना ॥४१॥
हे पंचदशीतील तृप्तिदीपांत । बोलिले विद्यारण्य भारतीतीर्थ ।
आणि टीका करिता समर्थ । रामकृष्णही बोलिले ॥४२॥
''भोक्ता स्वस्यैव भोगाय पतिजायादिनिच्छति ।
एष लौकिक वृत्तान्तः श्रुत्या सम्यगनूदितः ॥ (तृप्तिदीप २०१)





टीका -
ननु तर्हि ''आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति,
इत्यात्मशेषत्वं भोग्यस्य कथं प्रतिपाद्यत इत्याशंक्य,
न कूटस्थात्मशेषत्वं प्रतिपाद्यते ।
किंतु लोकप्रसिद्धोभयात्मकभोक्तृशेषत्वमेव श्रुत्यानूद्यत इत्याह भोक्तेति''
(य१४-२०)
लोकव्यवहारसिद्ध । जो अज्ञानें भोक्ता बोलिला प्रसिद्ध ।
तोचि सर्वाहूनि प्रिय विषद । केला अनुवाद श्रुतीनीं ॥४३॥
सर्व भोग्य आत्मयासाठीं । प्रिय, हे श्रुतीनें अनुवादिली गोष्टी ।
नाहीं उपदेशिली मोठी । लोक व्यवहारसिद्ध म्हणूनी ॥४४॥
यालागीं श्रुतींतील देव पद । भोग्य सांगे देवपद ।
म्हणोनि भोक्त्या आत्म्याची प्रियता प्रसिद्ध । दाखविली श्रुतीनीं ॥४५॥
कूटस्थ आत्म्याची प्रियता कांहीं । या श्रुतींनीं दाखविली नाहीं ।
ऐसा श्लोकाचा भावार्थ लवलाही । टीकेसहित जाहला ॥४६॥
जरी याची तृप्तिदीपांत । 'कूटस्थः शेषितः श्रुतौ' इत्यादि पदे विख्यात ।
तथापि 'निदिध्यासितव्य' म्हणूनी जो श्रुतींत । सांगितला आत्मा ॥४७॥
तद्वाक्यपरतीं पदे होती । उपदेशन्याये संभवती ।
प्रियता तंव लोकप्रसिद्ध निश्चिती । यालागीं भोक्तृशेषताख्याति योग्य ॥४८॥
लोकव्यवहार स्वभाव । की भोक्ता आत्मा प्रिय सांगणें सावेव ।
परी त्याहूनि शुद्ध परमात्मा स्वयमेव । अतितम प्रिय ॥४९॥
हाचि संभवे उपदेश । नातरी अनुवादे व्यर्थता श्रुतीस ।
म्हणोनि श्रुति कूटस्थशेष । तृप्तिदीपींचि बोलिली ॥५०॥
अहं ज्ञानदृष्टान्ते साक्षिज्ञान सिद्धस्थिति । 'प्रज्ञानं ब्रह्म' महावाक्योक्ति ।
तेवि भोक्तया आत्म्याची सांगोनि प्रीति । श्रुति भगवद्भक्ति उपदेशी ॥५१॥
सात्वत श्रुति ही प्रमाण । श्रोती ऐकावी सावधान ।
कीं प्रिय परमात्माचि आपण । म्हणोनिया ॥५२॥
गाई गोपाळ वत्स गोविंद । जाहला जेव्हां प्रसिद्ध ।
गाई गोपीस शुद्ध । मातृता आली ॥५३॥

तेचि दशम पूर्वार्ध तेरावियांत । पंचवीस सव्वीस श्लोका आंत ।
निरूपिले आहे यथार्थ । सावधान चित्त देऊनि ऐका ॥५४॥ (य१४-२१)

श्लोक

गोगोपीनां मातृताऽस्मिन् सर्वा स्नेहर्द्धिकां विना ।
पुरोवदास्वपि हरेस्तोकता मायया विना ॥२५॥
व्रजौकसां स्वतोकेषु स्नेहवल्ल्याब्दमन्वहम् ।
शनैर्निःसीम ववृधे यथा कृष्णे त्वपूर्ववत् ॥२६॥

९भाग.स्कं.१०अ.१३०

श्लोक २६ टीका :-

एतावत्तु वैषम्यं कृष्णस्यापि दुर्निवारमासीद् इत्याह,
गोगोपीनामिति गवां गोपीनां चास्मिन् कृष्णे मातृता उपलालनादिरूपा पुरोवदेवासीत्
किंतु स्नेहर्द्धिकां विना स्नेहाधिक्यं त्विदानीं विशेष इत्यर्थः ।
आसु गोगोपीषु हरेस्तोकता च बालभावनाऽपि पूर्ववदेवासीत्
किंतु मायया विना 'ममेयं माता, अहमस्याः पुत्र' इति मोहंविनेत्यर्थः ॥२५॥
स्नेहर्द्धिमेव दर्शयति व्रजोकसामिति ।
यथा कृष्णे यशोदानंदने स्वपुत्रेभ्योऽपि स्नेहाधिक्यं पूर्वमासीत् इदानीं स्वतोकेष्वपि तथैवावर्धतेत्यर्थः ।
आ अब्दं यावत्संवत्सरं निःसीम यथा भवति ॥२६॥
भावार्थ :-

भाषासूत्र -

भगवंताप्रति या स्थानीं जननी गाई गोपिका ।
पूर्व पुत्राहूनि देविं स्नेह वाढे विशेषता ॥१॥
माया मोहाविणें देव बाळभावेचि खेळतो ।

ओव्या -

जैसी पूर्वी नंदनंदनीं । प्रीति अधिक स्वपुत्राहूनि ।
होती तैसीच या स्थानीं । वाढली कृष्ण झालिया सूत ॥५५॥
एवं तेरावियांत निरूपिले । ते चवदावियांत आक्षेपिले ।
शुके तयाचें समाधान केले । तेही श्लोक ऐकावे ॥५६॥



श्लोक

''ब्रह्मन् परोद्भवे कृष्णे इयान् प्रेमा कथं भवेत् ।
योऽभूतपूर्वस्तोकेषु स्वोद्भवेष्वपि कथ्यताम् ॥''

(भाग.स्कंध१०.अ.१४श्लो.४९)

परिक्षिती म्हणे वेदवर्या । अहो जी श्रीगुरु शुकाचार्या ।
गोपींचे ठायी आर्या । एवढा कृष्णप्रेमा कैसा ॥५७॥
गुणवान दुसरिया पुत्राहूनि । आपुलिया पुत्रीं निर्गुणीं प्रेम दृष्ट आहे जनीं ।
मग परोद्भवीं कृष्णीं । गोपीप्रेम कैसा ॥५८॥
इया परिक्षितीच्या बोला । तो जगद्बंधु संतोषला । (य१४-२२)
मग उत्तरीं प्रवर्तला । सिद्धांतवशे ॥५९॥
आत्मीय जे पुत्रादिक । तयाहूनि आत्मा प्रिय एक ।
कृष्ण परमात्मा निष्कळंक । सर्वथा प्रिय ॥६०॥
भोग्यांचा भोक्ता पति । परमात्मा सकळांचा पति ।
परमात्मया नाहीं अन्य पति । हे ऐतरेयादि श्रुती बोलिल्या ॥६१॥

श्लोक

''सर्वेषामपि भूतानां नृप स्वात्मैक वल्लभः ।
इतरेऽपत्य-वित्ताद्यास्तद्वल्लभतयैव हि ॥
तद्राजेन्द्र यथा स्नेहः स्वस्वकात्मनि देहिनाम् ।
न तथा ममतालम्बिपुत्रवित्तगृहादिषु'' ॥

(ऐतरेय)

म्हणोनि आत्मता जेथ । प्रत्यक्ष दिसे प्रेम तेथ ।
ममतालंबि देहादि समस्त । तेथ प्रेम न दिसे ॥६२॥

श्लोक

''देहात्मवादिनां पुंसामपि राजन्यसत्तम ।
यथा देहः प्रियतमस्तथा न ह्यनुयेचतम् ॥
देहोऽपि ममताभाक् चेत्तर्ह्यसौ नात्मवत्प्रियः ।
यज्जीर्यत्यपि देहेस्मिन् जीविताशा बलीयसी ॥''
देहात्मवादि जे चार्वाक । ते ही ममतावलंबी पुत्रादिक ।

देहासमप्रिय न मानी निःशेख । म्हणोनि आत्मप्रियता निष्टंक अनुकूल ॥६३॥
आतां धार्मिक जे होती । ते धर्मासाठीं देह त्यागिती ।
परी परलोकीं सुख इच्छीती । आत्मयातें ॥६४॥
अल्प विवेकें देहममतावलंबे । होता धर्माशा होय अविलंबे ।
जीविताशा विलंबे । दुर्बल होय ॥६५॥
किंवा रोगादिकें देह पडेल तसाच । ऐसा निश्चय झालियाहि ऐसाच ।
जीविततृष्णा भास घे लाच । ती आत्माध्यासें ॥६६॥

श्लोक -

''तस्मात्प्रियतमः स्वात्मा सर्वेषामपि देहिनाम् ।
तदर्थमेव सकलं जगदेतृाराचरम्'' ॥०॥
म्हणोनिया जीवा । आत्माचि प्रिय वाटे सर्वा ।
तद्भोग्यत्वे विश्वा । प्रियता घडे ॥६७॥
आतां या आत्म्याच्या ठायीं । ममता वा संबंध नाहीं ।
तरी प्रियता जे उपजे लवलाहि । ते वस्तुसौंदर्य ॥६८॥
तथापि रसास्वादीं अभिमान । तेणें दुःख होय उपपन्न । (य१४-२३)
परी ते दुःख अविवेकिया कारण । सर्वथाही समजेना ॥६९॥
म्हणोनि भोक्तृशेष लोकसिद्ध प्रीति । जी सांगत आहे बृहदारण्यक श्रुति ।
तीचि घेऊनि दृष्टान्तीं । सात्वत श्रुति भगवद्भक्ति सांगे ॥७०॥

भागवत श्लोक -

'कृष्णमेनमेव हित्वात्मानमखिलात्मनाम् ।
जगद्धिताय सोऽप्यत्र देहीवाभाति मायया' ॥
तैं श्री भागवतध्वजमुखरथी । म्हणे गा ऐके परिक्षिती ।
श्रीकृष्ण आत्मयाचा आत्मा निश्चिती ।
''नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानां'' ही श्रुति साक्ष ॥७१॥
चेतनांचाही चेतन म्हणोन । आत्मयाचा आत्मा परमात्मा पूर्ण ।
या लागीं भोक्त्याहून । तेथ प्रीति अधिक होवावी ॥७२॥
लोकप्रसिद्ध भोक्त्याची प्रीति । अनुवादोन सांगे श्रुति ।
कीं सिद्धान्तीं भगवद्भक्ति । परम प्रीति परमात्मीं ॥७३॥



भाषासूत्र -

''देहदेहीविभागोऽत्र नेश्वरे विद्यते, चित्'' ।
या महावाराह वाक्यीं कृष्ण ब्रह्मतनु स्फुट ॥
तथापि देहवद्भाव मायेने मायिका जना ।
तेही लोक हितासाठी न स्वार्थी परेशकृत ॥

ओवी :-

मायाकार्य भगवच्छरीर । नाहीं हे प्रेमनिकुंजीं निरूपिलें समग्र ।
अनध्यस्तविवर्त करुणाकर । बिम्बभूत परब्रह्म ॥७४॥
सत्तात्रयवादीं सत्ताद्वयवादीं । या परमात्मयाची प्रसिद्धी ।
म्हणोनि येथ त्रिशुद्धि । बैसे प्रेमू ॥७५॥
आतां मूर्तिरूप श्रीकृष्ण । तेथ प्रेम नोहे उपपन्न ।
हें बोलणें असंपन्न । जनांचे कीं ॥७६॥
आत्मयाचें ठायीं प्रेमकारण । सर्वथा नोहे ज्ञान ।
अज्ञानासहीत तदध्यासें करून । आत्मप्रेम आहे म्हणूनी ॥७७॥
येथ तंव परमात्माचि प्रगटे । तरी वस्तुसौंदर्ये प्रेम कां न दाटे ।
या लागीं शंका न घटे । श्रुत्यन्वयें भक्तिविषयीं ॥७८॥
कृष्णास टाकूनि दुग्धाकडे । यशोदा कां गेली हा पूर्वपक्ष न घडे ।
यमलार्जुनार्थ कृष्णेचि मोहिले हे उघडे । दिसे तेथ ॥७९॥
किंवा भगवंतचि दुध मागेल म्हणूनी । रक्षावे हे समजोनी गेली जननी ।
(य१४-२४) ऐसा टीकाकारीं संतजनीं । काढिला अभिप्रावो ॥८०॥
किंवा दुग्ध माझियें स्तनीं । भगवत्तृप्ति पुरते आहे कीं नाहीं हे शंकुनी ।
दुग्धरक्षणा गेली जननी । हा ही अभिप्राय निघो शके ॥८१॥
इतुकेही असोनी । ते करणे प्रशंसिले नाही कोणी ।
म्हणोनी उपदेश्य भगवद्भक्तिस्थानीं । शंकाही नोहे ॥८२॥
असो ऐसी श्रीभगवंतीं । अत्यंत जी उपजे प्रीति ।
तयाचे नांव भगवद्भक्ति । हे सांगती सूत्रकार ॥८३॥

## सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा ॥२॥

'सा' हे लक्ष्यनिर्देशपद । 'परमप्रेमरूपा' लक्षणपद ।
'अस्मिन्' हे अधिकरणपद । भक्तिलागीं ॥८४॥
''इदमस्तु सन्निकृष्टः'' हा नियमू । अपरोक्ष सांगे पुरुषोत्तमु ।
आणि अंतर्यामीप्रतिपादक निगमू । तेचि बोधी ॥८५॥
''यो विज्ञाने तिष्ठन् विज्ञानं यमयति'' । इत्यादि बृहदारण्यकश्रुति ।
भगवदपरोक्षता सांगती । आणि जागृच्छ्रुतिहि असती ऐशा ॥८६॥

श्लोक

''उपद्रष्टाऽनुमन्ताच भर्ता भोक्ता महेश्वरः ।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन् पुरुषः परः ॥१३॥

गीता अ.५

याचि देहीं हृदयदेशीं । ओळख होय परमपुरुषीं ।
ते विशेषपण विशेष्यीं । बोलिली ऐशी अवधारा ॥८७॥
जो जीवासमीप दावोनि द्रष्टा । येणेहि मिळे अपरोक्षप्रतिष्ठा ।
आणि अनुमन्तृचेष्टा । अपरोक्षचि ॥८८॥
भर्ता येणें मानें । सकळ सुखसाधन पाळणें ।
अपरोक्षपणें । प्रत्ययत्वा ये ॥८९॥
भोक्ता म्हणूनि बोलिला । तो कर्मसमर्पणें वहिला ।
एरवी भोक्ता नाहीं जाहला । परमात्मा कदा ॥९०॥
किंवा जीवसंबंध माधुर्यादिक । तयाचा भोक्ता दिसे आपण एक ।
''रेमे रमेशो व्रजसुंदरीभिर्यथार्भकः स्वप्रतिबिम्बविभ्रमः''
इत्यादि श्लोक । प्रमाण निष्टंक ये विषयीं ॥९१॥ (य१४-२५)
म्हणोनि 'नैवात्मनः प्रभुरयं' इत्यादि श्लोकविरोधू । ऐसा येऊं न शके प्रवादू ।
महेश्वर परमात्मादि शब्दू । उपजवी बोधू ईश्वराचा ॥९२॥
महेश्वरशब्दें भक्तरक्षक । परमात्मशब्दें प्राप्य एक ।
योगप्राप्य जगचालक । ''पुरुषः परः'' शब्दें बोलिला ॥९३॥



''ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति'' ।
सर्व भूतांच्या हृदयीं परमात्मप्रतीति ।
ऐसी आहे जागृच्छ्रुति । आणि गुरुवाक्यप्रतीति सांप्रदायिक ॥९४॥

ओवी

''सर्व भूतांच्या अंतरीं । हृदयमहाअंबरीं ।
चिद्वृत्तीचिया सहस्त्रकरी । उदयला असे जो'' ॥९५॥

(ज्ञा.अ.१८.श्लो.६१.ओ.१२९९)

नमुनिया आळंदिवल्लभ चरणातें । श्रुतिभावार्थ उकलिजे येथे ।
तो सिद्धि नेयावा श्रीमंतें । करुणावंते चतुर्वर्ण-वाच्यें ॥९६॥
दोन प्रकारें हृदयीं वृत्ती । दृष्ट ऐशा उपजती ।
(१)चित्तवृत्ती आणि (२)चिद्वृत्ती । विशेषणविशिष्टत्वें प्रतीति ज्यांची ॥९७॥
तेथ (१)नामरूपाचिया मोहरा । धावती चित्तवृत्ती सैरा ।
(२)उपहितत्वे अस्ति भाति प्रियत्व परिकरा । चिद्वृत्ती दिसती ॥९८॥
यद्यपि अस्ति भाति प्रिय तिन्ही । साक्षित्वें न येती प्रेरकस्थानीं ।
तथापि चित्तचि जीवचेतनीं । प्रेरकत्व नये ॥९९॥
अंतर्बाह्य प्रदेश । दृष्टिसृष्टिवादीं कल्पनाविशेष ।
स्वप्नीं अंतर्बाह्य प्रदेश । अंतरींच कल्पित जेवीं ॥१००॥
हें मांडुक्य वैतथ्यप्रकरणीं । स्वयें बोलिले गौडपाद मुनि ।
म्हणवूनि बाहेरीं वा अंतःकरणीं । धांवती वृत्ती ॥१०१॥
त्या आघविया इदमाकार । जीव भोक्ता अहमाकार ।
भोक्ता भोग्यासी प्रेरकप्रकार । न घडे सर्वथा ॥१०२॥
भोक्ता भोग्या प्रेरकता । तरी मोडेल कर्मफळभोगव्यवस्था ।
अनिष्ट फळ भोगावया तत्वता । कवण इच्छी ॥१०३॥
अथवा भोक्ताचि प्रेरी सकर्म भोग्याप्रति । तरी जैनागमाची जाहली प्राप्ति ।
मग बुडाले श्रुति -। प्रामाण्य सकळ ॥१०४॥ (य१४-२६)
अथवा भोक्ता भोग्याते प्रेरिता । तरी प्रत्यक्षें मी सर्व कर्ता ।
ऐसा प्रत्यय सर्वथा । यावा जीवातें ॥१०५॥
तो प्रत्यक्ष नये म्हणून । आणि युक्तीसही विरोध पूर्ण ।

जीव अनेकत्वें कीं एकत्वें आपण । भोग्य प्रेरक हेतु असे ॥१०६॥
प्रथम पक्षीं स्वभोग्य कीं परभोग्य प्रेरी ।
अल्पशक्तित्वादि दोष येती आद्यपक्षावरी ।
आणि द्वितीयपक्षीं सर्व शक्ति सार्वपरी । कलहचि उपजे येथें ॥१०७॥
परस्पर इच्छाघाते । कलहचि उपजे येथें ।
मग राग द्वेष सर्वाते । सहजचि उत्पन्न ॥१०८॥
एकत्वें जीव भोग्य प्रेरिता । तरी सुषुप्तिवीण प्रत्यया नये सर्वथा ।
आणि दृष्टिसृष्टिवादीं कर्ता भोक्ता । जीवाभास तो अनेकविध ॥१०९॥
किंबहुना सर्वकर्ता । दृष्टिसृष्टिवादीं कल्पिला म्हणता ।
येणेही जीवाची प्रेरकता । निमाली होय ॥११०॥

श्रुति :-

''एतज्ज्ञेयं नित्यमेवात्मसंस्थं नातः परं वेदितव्यं हि किंचित् ।
भोक्ता भोग्यं प्रेरितारं च मत्वा सर्वं प्रोक्तं त्रिविधं ब्रह्ममेतत् ''

श्वेताश्वतर अ.१।१२.

भावार्थ :- दृष्टिसृष्टिवादें पाहता । आपुल्याच ठायीं तत्वता ।
भोक्ता भोग्य आणि प्रेरिता । हें तिन्ही ब्रह्मत्वें जाणावें ॥१११॥
आत्मसंस्थ प्रेरिता म्हणता । ईश्वरा आली अपरोक्षता ।
आत्मभिन्न परमेश्वर मानिता । निषेधिती स्मृती ॥११२॥
''आत्मस्थं यः परित्यज्य बहिस्थं यजते शिवम् ।
हस्तस्थं पिण्डमुत्सृज्य लिह्यात्कर्पूरमात्मनः।''

(शिवधर्मोत्तर०)

आत्मस्थ अपरोक्ष शिव सांडूनि । जो बाहेर यजी शिव परोक्ष मानोनी ।
तो हातीचे सर्वस्व सोडोनि । अन्यत्र धांवे ॥११३॥
'भोग्य' इदमाकार स्वप्नसम 'चित्तकल्पित' ।
'भोक्ता' अहमाकार वृत्त्यवच्छिन्न जीव विख्यात ।
'प्रेरिता' परमात्मा 'चिद्‌वृत्तिमंत'। हे तिनही आत्मस्थ चेतनत्वें ब्रह्म ॥११४॥
जीवाचे साक्षिस्वरूप । ज्ञाने अचल प्रकाशे अमूप ।
तया प्रेरक म्हणता साक्षेप । ईश्वरचि ते ॥११५॥ (य१४-२७)





येणेही गुणे परमेश्वरी । अपरोक्षभूती निर्धारी । प्रेरकता फावे म्हणोनी
साचारी । सर्वज्ञत्व सर्वशक्तिमत्वादि निर्धारी हृदयांतचि ॥११६॥
समष्टि-व्यष्टि हृदया भेद । चिंतनीं दहरविद्या प्रसिद्ध ।
तेथ हृदयविद्येचेचि फळ विशद । ब्रह्मादि लोक ॥११७॥
हा सृष्टिदृष्टिवाददंश तत्वता । परी दृष्टिसृष्टिवादी पाहता ।
जीवात्मा इहपरलोकानुभव तत्वता । हृदयींच घे ही वासिष्ठोक्ति ॥११८॥
येणें ही माने परमेश्वरू । अपरोक्ष होय निर्धारू ।
आणि तो चिद्वृत्तिसहस्त्रकरू । यास्तव आवृत नव्हे म्हणूनी अपरोक्ष ॥११९॥
परोक्ष होय आवरणापुरता । तरी तो अपरोक्षचि वस्तुता ।
दूरत्व-उपाधीने नित्यपरोक्ष म्हणता । तरी अव्यापकता येईल ईशा ॥१२०॥
जरी बिम्बभूत म्हणोन । उपाधिबहिः स्थान ।
परोक्षत्व कारण । म्हणों लागे ॥१२१॥
बिम्ब हे जिवाचे मूळ रूप । प्रतिबिम्ब मात्र आरोप ।
यालागीं अपरोक्षची हृदयदीप । परमात्मा तो ॥१२२॥
बिम्बा प्रतिबिम्बा संधि नाही । म्हणोनी उपाध्यन्तर ईश्वर नाही ।
हें कोटी न संभवे गा कही । अंतर्यामित्वश्रुतिसत्त्वे ॥१२३॥
बिम्बा-प्रतिबिम्बा खंडु पडता । तरी प्रतिबिम्बाची असिद्धता ।
म्हणोनी प्रतिबिम्बासही व्यापकता । बिम्बाची सिद्ध ॥१२४॥
दर्पण निरोधिना तेजाते । म्हणूनि प्रतिबिम्ब उमटे तेथे ।
न उभारोनि बिम्बखंडाते । सर्वथाही ॥१२५॥
माती बिम्बनिरोधे खंड पाडी । म्हणोनी नोभवे प्रतिबिम्ब गुढी ।
येणे ही अपरोक्षता गाढी ।
जीव प्रतिबिम्बापेक्षिक बिम्बत्वारोपावच्छिन्न बिम्बेशा ॥१२६॥
एवं चिद्‌वृत्तीचे सहस्त्रकर । तो हा परमात्मा सर्वेश्वर ।
चिद्‌वृत्तिउपहितत्वे कर । चिद्‌वृत्तीचे तयाते ॥१२७॥

पंचपादिका -

''आनंदो विषयानुभवो नित्यत्वं चेति सन्ति धर्माः
ब्रह्मणः ह्यपृथकत्वेऽपि चैतन्यात् पृथगिवावभासन्ते'' ।

ऐसी पंचपादिकेंत पद्मपादोक्ति ।
तयाचा अर्थ कीं सृदिानंद तिन्ही एक असती ।
परी वृत्तिउपहितत्वें प्रगट भासती । भिन्न ऐसे ॥१२८॥ (य१४-२८)
तो आनंद विशेष साकार । अनध्यस्तविवर्त भगवच्छरीर ।
होय तेथ अविचल सुंदर । प्रेम ते भक्ति ॥१२९॥
अवस्थात्रय तिन्ही लोक । प्रकाशूनि अशेख ।
अन्यथादृष्टि पांथिक । चेवविले ॥१३०॥
तीन अवस्था लोक तिन्ही । प्रकाशी जो हृदयींच राहोनी ।
कां अवस्था लोका हृदयावांचुनी । स्थितीचि नाहीं म्हणोनिया ॥१३१॥
सुषुप्ति अविद्याकारण । कार्यप्रपंच जागृत्स्वप्न । जागृति तो इह लोक जाण ।
इहपरलोकसंधि स्वप्न बृहदारण्यक श्रुति म्हणे ॥१३२॥
''तस्य ह वा एतस्य पुरुषस्य द्वे एवास्थाने भवतः'' (४।३।९)
जीवाची दोन स्थानें असती । तया इहलोक आणि परलोक म्हणती ।
स्वप्न एक मध्यवर्ती । तिसरें स्थान ॥१३३॥
स्वप्नामाजीं उभा राहोनी । जीव इहपरलोक देखे दोन्ही ।
वार्तिककारादिक या स्थानीं । म्हणती ऐसे ॥१३४॥
जीव बाळपणीं स्वप्न पाहे पूर्व जन्मीचे । तरुणपणीं स्वप्न पाहे या जन्मीचे ।
वृद्धपणी स्वप्न पाहे पुढील जन्मीचे । हा दंश वार्तिकांत पहावा ॥१३५॥
बृहदारण्यक मूळ वार्तिक । आणि योगवासिष्ठ देख ।
मिळविता जागृत्स्वप्न सकळिक । होती एकरूप निश्चयें ॥१३६॥
सुषुप्ति माया बीजभाव । जागृत्स्वप्न तो फळभाव ।
हे स्वयें बोलिले आळंदिराव । भावार्थदीपिकेत पंचदशीं ॥१३७॥

ज्ञाने.

''वस्तुशीं आपुला जो अबोध । तो उर्ध्वी आठुळैजे कंद ।
वेदान्ती हाचि प्रसिद्ध । बीजभाव ॥१३८॥ ज्ञा.अ.१५
घनअज्ञान सुषुप्ति । तो बीजांकुर भाव म्हणती ।
येर स्वप्न हन जागृती । हा फळभाव तियेंचा ॥१३९॥ ज्ञा.अ.१५
तैसी इया वेदान्तीं । निरूपणभाषाप्रतीति ।





परी ते असो प्रस्तुती । अज्ञानमूळ ॥१४०॥'' ज्ञा.अ.१५
ईश्वराश्रित जीव उपाधि । अज्ञान जे बोलिजे आधीं ।
तो बीजभाव आणि सुषुप्ति प्रसिद्धि । बीजांकुर भाव ॥१४१॥ (य१४-२९)
सुषुप्ति अज्ञानस्वरूप । या लागीं बीजभाव तो अमूप ।
आणि येथोनिचि उठे संकल्प । म्हणून अंकुरभावही ॥१४२॥
तथापि सुषुप्ति । सांगावया पुनरुक्ति ।
कारण कीं स्वप्नासम प्रपंचप्रतीति । जीवहृदयीं दृष्टिसृष्टिवादें ॥१४३॥
म्हणोनी स्वप्न आणि जागृति । सुषुप्तिफळचि बोलती ।
एवं उत्तम सिद्धांन्त जो वेदान्तीं । तो येथ दाखविला ॥१४४॥
म्हणोनी ज्या तीन अवस्था । त्याचि तीन लोक गा तत्वता ।
तयांचे प्रेरकत्व भगवंता । हृदयस्थचि पातले ॥१४५॥
यालागी तया निष्कलंका । अपरोक्ष म्हणता न घेयावी शंका ।
हाही प्रत्यय निका । स्पष्ट वचनें आचार्य वदती ॥१४६॥
असो रूपक हे, <u>तो ईश्वर । सकळ भूतांचा अहंकार ।</u>
<u>पांघरोनी निरंतर । उल्हसत असे</u> ॥१४७॥
एवं इदमाकारोपहित चिद्वृत्तिकर । आतां जो सकळ भूतांचा अहंकार ।
तो मुख्य जीव तया वस्त्रांतर । अहमाकार वृत्युपहित दिवाकर ईश्वर असे ॥१४८
अहंकार अनात्माध्यास धरी । तैं प्रेरकता ये ज्या अंतराहंकारी ।
ते चेतन परब्रह्म निर्धारी । परमेश्वरू ॥१४९॥
<u>म्हणूनी भोक्तृशेष जे आत्मप्रीति । ते अहंकार गळता होय भक्ति ।</u> विवरणकार
मुक्तप्राप्ति ईश्वर म्हणती । आणि <u>भक्तत्र्यहंकृति नाशीं भक्त भगवंतु</u> ॥१५०॥
''देवचि झाला भक्तु । ठावचि झाला पंथु ।''
म्हणोनी महाभारती शान्तिपर्वणीं । मोक्षधर्मी मुक्तचि उपास्य ही भीष्मवाणी ।
आणि संतचि ईश्वर म्हणोनी । अनेक वाक्य ॥१५१॥
सद्गुरु परमेश्वरु । हा तो सर्वत्र निर्धारु ।
शिष्येंचि कल्पिला होय गुरु । आणि मुक्तही ईश्वरु परदृष्ट्या ॥१५२॥
आपण एक मुक्त जाहला । परी बद्धसंसार प्रेरकत्वा आला ।
आधीं होतेचि कीं ययाला । अन्यप्रेरकत्व ॥१५३॥

म्हणोनी सर्वथा उपास्य ईश्वरु । हाचि श्रुतींचा निर्धारु ।
तो अनध्यस्त विवर्त साकारु । सर्वदा सेव्य ॥१५४॥ (य१४-३०)
तो नोहेचि मायाशरीर । येथ श्रुति श्वेताश्वतर ।
सांगे तो विचार । ऐकावा श्रोतीं ॥१५५॥

श्वेताश्वतर श्रुति

''द्वे अक्षरे ब्रह्मपरे त्वनन्ते विद्याविद्ये निहिते यत्र गूढे ।
क्षरन्त्वविद्याह्यमृतं तु विद्या विद्याविद्ये ईशते यस्तु सोऽन्यः ॥

आचार्य भाष्य :-

द्वे विद्याविद्ये यस्मिन्नक्षरे ब्रह्मणो हिरण्यगर्भात्परे ब्रह्मपरे परस्मिन् वा ब्रह्मण्यनन्ते देशतः कालतो वस्तुतो वाऽपरिच्छिन्ने ।

यत्र यस्मिन् द्वे विद्याविद्ये निहिते स्थापिते गूढे अनभिव्यक्ते विद्याविद्ये विविच्य दर्शयति ।

क्षरन्त्वविद्या क्षरणहेतुः संसृतिकारणम् ।

अमृतं तु विद्या मोक्षहेतुः यस्तु पुर्नविद्याविद्ये ईशते नियमयति सताभ्याम् अन्यस्तत्साक्षित्वात् ॥१॥ अध्याय ५

भावार्थ :- श्रुतीचा शांकरभाष्य सहित । जे आता बोलिजेल भावार्थ ।
परब्रह्मी विद्याविद्या स्थापित । दोन्ही शक्ति ॥१५६॥
तेथ अविद्या जडली जीवा यया । जे कारण नाशिवंत संसारा या ।
विद्या ते सात्त्विक बोलिजे माया । जी ज्ञानरूपें कारण मोक्षाते ॥१५७॥
ह्या विद्या आणि अविद्या दोन्ही । नियमी तो परमात्मा वेगळा याहूनी ।
राहिला असे साक्षी होवोनि । हा श्रुतिभाष्यभावार्थ ॥१५८॥
यांत ऐसी मन्तव्य प्रतीति । कीं विद्याविद्या दोन्ही शक्ती ।
जरी परमेश्वरानियम्य होती । तरी नियामकप्रतीति मायाजन्य नव्हे ॥१५९॥
आतां मायाऽवच्छेदावच्छेदजन्य नियामकता । तरी हानि न घडे सर्वथा ।
तया नियामका भगवंता । स्वयें शरीर धरणें घडे ॥१६०॥
येथ आक्षेपिती भलते । कीं भगवच्छरीर अव्यापक होतें ।
तरी तयांचे श्रीमंते । परिहारिले बळ ॥१६१॥
''हो कां जे कृष्णाकृतीचिये मोडी । होती विश्वरूपपटाची घडी ।



ते अर्जुनाचिये आवडी । उकलूनि दाविली'' ॥

(ज्ञा.अ.११)

येथ न्यून आणि बहु देश । हा आघवा मायाविलास ।
तरी ब्रह्मांडविशेष । बोलिले योगवासिष्ठी ॥१६२॥
अल्पदेशी हृदयस्थानीं । स्वप्नब्रह्मांडानुभव जनी ।
किंबहुना लोक तिन्ही । स्वप्नींच देखे ॥१६२॥ (य१४-३१)
परमात्मयाच्या तवं ठायी । देश काळ सर्वही ।
न संभवती लवलाही । उपाधिकार्य म्हणोनी ॥१६४॥
ऐसिया भगवंता । व्याप्य आणि व्यापकता ।
उपाधि वाचुनी संबोधिता । वृथा होय ॥१६५॥
अल्पही माया कल्पी बहु देश । म्हणवूनि तदुपहित परमेश्वर शरीरास ।
अल्प दिसूनहि ब्रह्मांडास । व्यापिता ये कीरूं ॥१६६॥
यालागीं कृष्णाकृतीचिये मोडी । बोलिली विश्वरूप पटाची घडी ।
द्वादशोपोद्घातींही उघडी । श्रुतीचि ऐसी ॥१६७॥
''पैं जे वानी श्यातुका । तेचि वेगळीये वाला एका ।
म्हणूनी एकदेशिया व्यापका । सरिसा पाडू ॥
अमृताचिये सागरी । जे लाभे सामर्थ्याची थोरी ।
तेचि दे अमृतलहरी । चुळी घेतलीया ॥२६॥''

(ज्ञानेश्वरी अ.१२.श्लो.२५-२६)

अर्थ :- शंभर भार कनका कसवटी । तेचि निर्मळे वालाचिये साठीं ।
तेवि एकदेशीय-व्यापक गोठी । सरिसी परिपाटी प्रेमळा ॥१६८॥
अमृतसागरलहरी दृष्टान्त । स्पष्ट आहे तो जाणावा यथार्थ ।
पूर्वपक्षी झणी येथ । ऐसे म्हणे ॥१६९॥
कीं अमृतलहरी दृष्टान्ते । ब्रह्म अल्प भक्तिहाते ।
मिळे ते केवि मोक्षाते । उपयोगी पडे ॥१७०॥
तरी आम्हीही पुसतो संप्रति । उत्तर देई शुष्क वेदान्ती । ज्ञानें ब्रह्माकार होय
अल्प अंतःकरणाची वृत्ति । तियेंतील अल्प ब्रह्म मोक्षोपयोगी कैसे ॥१७१॥
अंतःकरणाची अल्प वृत्ति । जरी सर्व ब्रह्मकार होय हे धरिशी चित्तीं ।

तरी अंतःकरणांतर्वृत्ति । भगवच्छरीर सर्वव्यापक कां नव्हे ॥१७२॥
तयाचे अल्पवद्दर्शन । ते आमुचिया अनुग्रहा कारण ।
आणि विषयत्वे भौतिकपण । नयेचि तया ॥१७३॥
प्रेमें हृदयीं आविर्भवे । योग्य इंद्रिये आलिंगनादौ तैसे संभवे ।
म्हणोनी शब्दादि विषयसम इंद्रियग्राह्य नोहे । हे अनुभवरूपाचार्य वदले ॥१७४॥
(य१४-३२)

''ततः स्वयं प्रकाशत्वभक्त्या स्वेच्छाप्रकाशया -
सोऽभिव्यक्तो भवेन्नेत्रे न नेत्रविषयस्त्वतः'' (लघुभागवतामृत)

हें चैतन्यसंप्रदायीं परी वचन प्रमाण । यास्तव कीजेल भावनिरूपण ।
निजेच्छादत्त भक्तियोगेंकरून । स्वयंप्रकाश भगवान अभिव्यक्त नयनीं ॥१७५॥
नयनाचा रूप विषय म्हणूनी । अभिव्यक्त नोहे चक्रपाणी ।
यास्तव रासमंडळी जियेचा तिये लागूनी । दृष्ट श्रीहरी ॥१७६॥
नारायणाध्यात्मस्मृती । आणि पद्मपुराणोक्ति ।
सद्दिदानंद भगवच्छरीर सांगती । आणि हेचि भागवतीं बोलिले ॥१७७॥

भागवत श्लोक

''सत्यज्ञानानंतानंदमात्रैकरसमूर्तयः।
अस्पृष्टभूमिमाहात्म्या अपिह्युपनिषद्दशाम्''॥५४॥
(स्कंध१०.अ.१३)

सत्याज्ञानानंतानंद । ह्याचि मूर्ती जाहल्या प्रसिद्ध ।
येणें मायाकार्यकलंक अशुद्ध । निवारिला ॥१७८॥
जे कां उपनिषदृष्टि । करिती वेदान्ताच्या गोष्टी ।
तया भक्तिविण प्रेमाद्वैत सृष्टि । नकळेचि ही ॥१७९॥
श्रुतीही आहे प्रमाण । त्रिपादमहानारायण ।
तेही श्रोतीं सावधान । परिसावी ॥१८०॥

त्रिपादमहानारायणोपनिषत् अ.२ :-
''साकारस्तु द्विविधः । सोपाधिको निरुपाधिकश्च ।
तत्र सोपाधिकसाकारः कथमिति ।
आविद्यकम् अखिलकार्यकारणजालम् अविद्यापाद एव नान्यत्र ।

22



तस्मात् समस्ताविद्योपाधिः साकारः सावयव एव ।
सावयवत्वादवश्यमनित्यं भवत्येव ।
सोपाधिकसाकारो वर्णितः ।
तर्हि निरुपाधिकसाकारः कथमिति ।
निरुपाधिकसाकारस्त्रिविधः ।
[1]ब्रह्मविद्यासाकारश्च [2]आनंदसाकार [3]उभयात्मकसाकारश्चेति ।
त्रिविधसाकारोऽपि पुनर्द्विविधो भवति ।
[1]नित्यसाकारो [2]मुक्तसाकारश्चेति ।
नित्यसाकारस्त्वाद्यन्तशून्यः शाश्वतः ।
उपासनया ये मुक्तिंगतास्तेषां साकारो मुक्तसाकारः
तस्याखंडज्ञानेनाविर्भावो भवति ।
सोऽपि शाश्वतः मुक्तसाकारस्त्वैच्छिक इति अन्ये वदन्ति ।
शाश्वतत्वं कथमिति ।
अद्वैत-अखंड-परिपूर्ण-निरतिशयपरमानंद-शुद्ध-बुद्ध-मुक्त-सत्यात्मक-
ब्रह्मचैतन्यसाकारत्वात् निरुपाधिकसाकारस्य नित्यत्वं सिद्धमेव''॥(य१४-३३)

सोपाधिक साकार जीवाचा भौतिक ।
अनध्यस्तविवर्तसाकार निरुपाधिक ।
त्यांतही नित्य साकार परमेश्वराचा एक ।
आणि मुक्त साकार तो भगवत्प्राप्ति जाहलीयांचा ॥१८१॥
मुक्तासी सगुणेश्वरभावापत्ति । सूत्रभाष्याशयें अपय्यादीक्षितादी सांगती ।
म्हणोनी विरोध नाहीं वेदान्ती । तव वादी म्हणे एक चित्तीं परिसा ॥१८२॥
परमेश्वर साकार तुम्ही म्हणता । तरी वल्लभमतीय सर्वसाकार ब्रह्म मानिता ।
तुम्हा काय चित्ता । अपराधू वाटे ॥१८३॥
सिद्धान्ती म्हणे ऐक वचन । जीव मूळ स्वरूप निराकार अनुभूत पूर्ण ।
तयाचें साकारीं मानिता ऐक्य वचन । तरी तें ज्ञानें न होईल ॥१८४॥
ज्ञानें साकार ऐक्यता । क्रियेविण न घडे सर्वथा ।
'ज्ञानादेव तु कैवल्यं' या श्रौता । अनालंबनता घडेल ॥१८५॥
म्हणोनी अनध्यस्त विवर्त । आम्ही साकार मानितो निश्चित ।

भगवद्देह नाहीं मायाजनित । हे प्रेमनिकुंजादि ग्रंथांत युक्तिसिद्ध बोलिलो ॥१८६॥
तया साकार परमेश्वराचे ठायीं । अत्यंत प्रेम ते भक्ति पाही ।
तव वादी म्हणे येथ द्वेषही । उपयोगी पडे ॥१८७॥
हिरण्याक्ष रावणादिक । द्वेषेचि पावले भगवत्सुख ।
या लागी परम प्रेमची एक । भक्ति ऐसे म्हणवेना ॥१८८॥
सिद्धान्ती म्हणें हे अबोलणें । तया कथेचे मूळ देखणें ।
जय-विजयातें सनकादिकी शापणें । तैं नारायणें अनुग्रह केला ॥१८९॥
दैत्ययोनींत जावोनी । द्वेषें मज ध्याता मनीं ।
पुढती येतील माझ्या स्थानीं । द्विजापराधी हे ॥१९०॥
एवं भागवतीं तृतीय स्कंधीं । सोळावे अध्यायीं वचनोपलब्धी ।
आतां जयविजयांची ही प्रार्थना प्रसिद्धी । तेही तेथचि पंचदशीं ॥१९१॥

श्लोक -

''भूयादघोनि भगवद्भिरकारि दंडो यो नौ हरेत सुरहेलनमप्यशेषम् ।
मा वोऽनुतापकलया भगवत्स्मृतिघ्नो
मोहो भवेदिह तु नौ व्रजतोरधोऽधः ॥३६॥ (य१४-३४)

(भाग..३-१६)

भावार्थ :- सनकादिकीं जय विजय । शापिले तैं तिही स्वये ।
कर जोडोनी विप्रवर्य । प्रार्थिले भावे ॥१९२॥
आम्हाते जो शाप दिधला । तो आपुला अपराध नाहीं जाहला ।
आम्ही ईश्वराज्ञाभंग केला । तेणें पापें जोडला शापू ॥१९३॥
तो तुमचेनि हातें । हा अनुग्रहचि होय येथें ।
साधूचा दंडही अनुग्रहाते । पाववीं शेखीं ॥१९४॥
प्रारब्धें गंगेंत वाहोनी मेला । तरी तो अवचिता मोक्षा गेला ।
तेवि सत्पुरुष दंड बोलिला । अनुग्रहचि ॥१९५॥
आणि तुम्हाते अनुताप । जाहला कीं आम्हीं वृथा दिधला शाप ।
तेणें आम्हाविषयीं आपेआप । कृपा उपजली तुमचे ह्रदयीं ॥१९६॥
तिये कृपेनें एवढे घडो । आम्हा पाप योनींतही मोह न पडो ।
भगवंताची आठवण न मोडो । कल्पांतींही ॥१९७॥



हें जयविजयाचें प्रार्थनावचन । मागितले भगवत्स्मृतीचे वरदान ।
मग द्वेषें केले भगवद्भजन । हें म्हणणेंचि मिथ्या ॥१९८॥
द्वेषाचे ऐसे लक्षण । कीं गोड न वाटे आठवण ।
आतां परमात्मयाचा द्वेषही जाण । सर्वथा न संभवे ॥१९९॥
''य एनं द्वेष्टि स तस्य वधं मनसा ध्यायति'' ।
ऐसी प्रत्यक्ष आहे श्रुति । तियेचा अर्थ कीं जो द्वेषी जया प्रति ।
तो तयाचा वध चित्तीं आणी ॥२००॥
परी ईश्वराचा वध चित्तीं आणिता । ते हास्यास्पद होय सर्वथा । आणि
रावणादिकांची काव्यें वाचिता । तरी अनीश्वरता तेथ न दिसे ॥२०१॥
रावणाचे शिवतांडव स्तोत्र । तेथ अनित्य नाहीं बोलिला ईश्वर ।
ईश्वरपर वैशेषिक सूत्र । त्यावरही रावणभाष्य ऐकिले ॥२०२॥
विष्णुपुराणीं कृष्णाच्या ठायीं । शिशुपाळें ईश्वरता जाणिली पाही ।
ऐसें बोलिलें यास्तव लवलाही । ईश्वरद्वेष घडेचिना ॥२०३॥
कृष्णादि व्यक्तींचा द्वेष । तो ईश्वर जाणुनी तरी लीलाविशेष । (य१४-३५)
द्वेषें योगाची प्राप्ती निःशेष । न घडेचि कदा ॥२०४॥
द्वेषें यम हे पहिलेची अंग मोडे । तेथ योग कासयाचा घडे ।
म्हणोनी भगवदनुग्रहेंचि द्वेषें योग घडे । हिरण्याक्षादिकासी ॥२०५॥

श्लोक -

''यत्र यत्र मनो देही धारयेत्सकलं धिया ।
स्नेहाद्द्वेषाद् भयाद्वापि याति तत्तत्स्वरूपताम् ॥''
यद्यपि ऐसी आहे स्मृति । कीं स्नेहें द्वेषें वा भये मनोवृत्ति ।
जेथ सकल ठेवी तयाचे सम रूपाप्रती । तो पुरुष पावे ॥२०६॥
तथापि स्नेह आत्मप्रेम म्हणून । प्रत्यक्ष परमात्मीं होय उपपन्न ।
आणि द्वेषें जरी घडे ध्यान । तरी ते जाण भक्ती नोहे ॥२०७॥
भक्तीनें ध्यानीं समानंदता । गुणींही तोचि प्रत्यय तत्त्वता ।
आणि द्वेषें ध्यानीं पावलिया सरूपता । प्रेम उपजलिया आनंदता फावे ॥२०८॥
किंवा द्वेषें ध्यानची घडे । आणि वितर्क समाधिही जोडे ।
परी अभ्यासे आनंदसमाधि होता उघडे । प्रेम दशाचि ॥२०९॥

हेंचि भयाची स्थिति । म्हणोनी द्वेष-भयही भगवद्भक्ति उपाय ही तातोक्ति ।
भगवत्प्राप्तीसाठीं भगवद्वेषी वृत्ति । तरी कोपें जनन्याव्हानसम ॥२१०॥
संसारप्राप्तिस्तव भगवद्वेष । तरी दुर्गति न चुके त्यास ।
हे बोलिलें कमलानिवास । निज मुखेंचि ॥२११॥

श्लोक -

''तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान् ।
क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेवयोनिषु ॥१९॥'' गीता अ.१६
ययाचा शांकरभाष्यान्वयें अर्थ । कीं मज जे द्वेषिती नराधम समस्त ।
तया मी बळेंचि टाकींत । नरकयोनीं ॥२१२॥
सूत्रकारही सांगतींल पुढें ।
'ईश्वरस्याप्यभिमानिद्वेषित्वाद्दैन्यप्रियत्वाा' इत्यादि पद रोकडे ।
यालागीं द्वेषें न जोडे । भगवद्भक्ति ॥२१३॥
किंवा द्वेषें ध्यान लागले । तेणें स्वरूपता पावोनि पृथक् राहिले ।
तरी तैसेचि होते जयविजय पहिले । चतुर्भुज द्वारपाळ ॥२१४॥
तेथ ही घडला प्रमादु । म्हणोनी द्वेषअपराधू ।
पाहिजे वृत्ति संबंधु । प्रेमाचाची ॥२१५॥ (य१४-३६)
ईश्वरीं द्वेषसंभवनचि नाहीं । यास्तव प्रेमचि करावा सर्वदाही ।
गुरुव्यक्तिद्वेष तवं लवलाही । महादुःखदायक ॥२१६॥
''शिवे रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चनेति'' । स्वये वदत आहे स्मृति ।
कीं क्षोभलिया सद्गुरुमूर्ती । तारूं न शके ईश्वरू ॥२१७॥
ईश्वरवचनेंचि निवटे अज्ञान । वचन तंव गुर्वधीन ।
तो गुरुचि झालीया अप्रसन्न । ईश्वरे अवचन ज्ञान कैसे दिजे ॥२१८॥

पूर्व पक्ष

तंव वेदान्ती म्हणे विनोदें । ज्ञान नोहे ईश्वर प्रसादें ।
श्रवणादिक विषदें । कारणें यांची ॥२१९॥
यद्यपि उपासना कांहीं । दृढ बोधाचिया विरोधी नाहीं ।
तरी लोकसंग्रहाविण नाही । प्रयोजन तियेचे ॥२२०॥
आणि मंदबोधाच्या विरोधी । उपासना राहे त्रिशुद्धि ।





म्हणोनी श्रवणादिकेचि सिद्धि । दृढ बोधाची मंद ज्ञानिया ॥२२१॥
आता तीव्र जिज्ञासु जो आपण । तयासही उपासनेचें फळ मिळालें म्हणून ।
श्रवणादिक पूर्ण । करावे ज्ञानार्थ ॥२२२॥

आरूढ पतित

मंद जिज्ञासु जरी जाहला । आणि श्रवणी प्रवर्तला ।
तरी श्रवण त्यागोनी तयाला । कर्म उपासना योग्य नाहीं ॥२२३॥
श्रवण त्यागोनी कर्म उपासना करी ।
तरी तया आरूढ पतित म्हणती सदाचारी ।
अहिंसा शमादि कर्मे ज्ञानाधिकारी । ऐसा वेदान्तडिंडिमू ॥२२४॥

कर्म-उपासनेचा अधिकारी

जो केवळ विषयी जाहला । आणि पामरभाव उल्लंघिला ।
कर्म उपासनेसी बोलिला । अधिकारी तो ॥२२५॥
तयासीचि ईश्वर प्रसादापेक्षा । ईश्वरप्रसादें श्रवणादि दीक्षा ।
म्हणोनि वेदान्तीं करता परीक्षा । न टिके भक्ति ॥२२६॥

उत्तरपक्ष

इया पूर्वपक्षा सिद्धान्ती । न ढळू देता शांति ।
आणोनी उत्तरप्रांती । आरूढ करी ॥२२७॥
भगत्प्रसाद स्तोत्रादिकांत । आचार्य स्वीकारती यथार्थ ।
म्हणोनी तैत्तिरीयभाष्य संकोचित । युक्तिविशेष जाहले ॥२२८॥
भगवत्प्रसादेविण ज्ञान होय ही नियती । न सांपडे आचार्य म्हणती ।
परी भगवत्प्रसाद झालियावरी ज्ञानाची अप्राप्ती ।
कोठें निश्चिती देखिली कवणें ॥२९९॥
''श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्'' इत्यादि वचनें ।
(य१४-३७) श्रवणादिकांचाचि नियम निवारणें ।
अहिंसा शमादिक तंव कारणें । भगवत्प्रसादाहि अनुषंगे ॥२३०॥
''तेषां प्रकृतिवैचित्र्यात् चित्रावाचः स्त्रवन्ति हि''
या न्याये ध्वन्यादि शब्दवृत्तिही । नानाविध भासे म्हणोनीहि ।
शब्दार्थी परमेश्वरप्रसादापेक्षा ॥२३१॥

यद्यपि शक्ति वृत्ति समान । तरी अशक्ति आग्रह निवटावया कारण ।
परमेश्वर प्रसादापेक्षां पूर्ण । शब्दार्था-विषयीं ॥२३२॥

''ज्ञानस्य साधनं मुख्यं देवतानुग्रहः परः ।
यः सर्वभावनः स्वात्मदेवतासुपसंगतः''

टीका :-

परः मुख्योऽनुग्रहः ।
अयं मे परमभक्त एतद् वांछितमवश्यं पूरणीयामिति स्वीयत्वेन ग्रहणं ।
अनुग्रहे कारणमाह ।
सर्वभाव इति वाङ्मनः कर्मभिः उपसंगतः सामीप्यसम्यक्प्राज्ञः ।
सततमत्यक्तदेवताभावन इति तात्पर्यम् ।
जपध्यानकर्मैकपरः ।
स्वात्मदेवतां स्वान्तर्यामितया स्थितां ॥७॥

अन्यानपेक्षमेतत्तु फलसंसाधने क्षमम् ।
एतद्विहायान्यदत्र न सम्यक् फलदं भवेत् ॥९॥

टीका :-

सर्वोत्तमत्वमुपपादयति अन्येति ।
एतत् तत्परत्वम् ।
तु अवधारणे एतदेवेत्यर्थः ।
क्षमं समर्थम् ।
एतत् तत्परत्वम् ।
अन्यत् श्रवणादि ।
न सम्यक् फलदं देवतानुग्रहं विना केवलश्रवणाद्यैः
फलपर्यवसायि ज्ञानं भवेदिति भावः ॥९॥
*(त्रिपुरारहस्य अ.२१)*

टीकेसहीत श्लोकभावार्थ । ईश्वरप्रसादचि ज्ञानदानीं समर्थ ।
श्रवणादिक ते तत्सहकृत । ज्ञानदायक पैं होती ॥२३२॥
येथ श्वेताश्वतर श्रुति । मान अवराधारावी श्रोतीं ।



शांकरभाष्यही तयावरुती । सरहस्य सांगू ॥१३४॥

श्लोक -

''यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः''॥

भाष्यः -

अत्रापि देवतागुरुभक्तिमतामेव गुरुणा प्रकाशिता विद्या अनुभवाय भवतीति प्रदर्शयति यस्येति । (य१४-३८)
यस्य पूरूषस्याधिकारिणो देव इयत्ताप्रबंधेन दर्शिताखण्डैकरसे सृादिानंद-परंज्योतिस्वरूपिणि परमेश्वरे परोत्कृष्टा निरूपचरिता भक्तिः एतदुपलक्षणम् ।
अचांचल्यं श्रद्धा चोभे यथा तथा ब्रह्मविद्योपदेष्टरि गुरावपि तदुभयं यस्य वर्तते ।
तस्य तस्य तप्तशिरसो जलराश्यन्वेषणं विहाय यथा साधनान्तरं नास्ति ।
यथा च बुभुक्षितस्य भोजनादन्यत्र साधनान्तरं न ।
एवं गुरुकृपां विहाय ब्रह्मविद्यादुर्लभेति त्वरान्वितस्य मुख्याधिकारिणो महात्मन उत्तमस्यैते कथिता अस्यां श्वेताश्वतरोपनिषदि श्वेताश्वतरेण महात्मना कविनोपदिष्टः प्रकाशन्ते स्वानुभवाय भवन्ति ।
द्विर्वचनं मुख्यशिष्य तत्साधनादि दुर्लभप्रदर्शनार्थम् अध्यायपरिसमाप्त्यर्थम् आदरार्थं च ॥५३॥

सभाष्यश्रुतिभावार्थ । जे ईश्वर-सद्‌गुरु भक्तिमंत ।
तयासीचि गुरुवाक्यापासोनी यथार्थ । ब्रह्मज्ञान उपजे ॥२३५॥
एवं तैत्तिरीयभाष्यांत जो ईश्वरप्रसाद खंडिला ।
तो या श्वेताश्वतर भाष्यांतचि मंडिला ।
म्हणोनी श्रवणस्तुत्यर्थ जाहला । तैत्तिरीय भाष्यानुवादु ॥२३६॥
या श्वेताश्वतर श्रुतीची टीका । कर्ता नारायण वदे निका ।
की देवगुरुभक्ति अकलंका । ज्ञानासी अंतरंग साधन ॥२३७॥
हे याचि श्रुतीच्या भाष्यांत । बोलिले विज्ञान *(भिक्षु)* भगवंत ।
म्हणोनी मुमुक्षुप्रत । ईश्वरप्रसाद अपेक्षा ॥२३८॥
आतां जे बोलिले वेदान्तश्रवण । तेही गुरुभक्ति दाढर्याचे कारण ।
श्रवणउपकारेचि गुरुभक्तींत मन । अधिक आवेशे ॥२३९॥

आणि नियमें करावे श्रवणादिक । त्यांत श्रवणभक्तिहि असे एक ।
सगुणगुणश्रवणहि नैष्ठिक । भगवन्महिमा दाखवी ॥२४०॥
अवघिया वेदान्तीं भगवन्महिमा । समन्वयाध्यायीं विचारगरिमा ।
आणि श्रवणादिकींहि निर्गुणप्रेमा । उपजे कीरू ॥२४१॥
परी विषयसमर्पणीं कारण । भगवद्भक्तीचि निदान ।
विषय ज्ञाना विरोधी नाहीत जाण ।
परी विषयजन्य दुःखहि ज्ञानविरोधी नव्हे ॥२४२॥ (य१४-३९)
विषय इंद्रिये अर्पिता भगवंतीं । तरी तज्जन्य दुःख न दे ग्लान्ति ।
अथवा दुःखींही प्रतीति । वियोगलालनवन्माधूर्यप्रेम ॥२४३॥
दुःख ते देईल सर्व सुखफळ । हे तुकाराम वदले भक्तिशीळ ।
यालागी भगवत्प्रेमळ । सुखीं दुःखीं सुखमय ॥२४४॥
तंव पूर्वपक्षी म्हणे आपण । उपदेशसाहस्रींत ईश्वरात्मप्रकरण ।
तेथ आचार्य बोलिले की आत्मत्वे न घेतां भगवान ।
तरी युक्तीनें शून्यवर्णन होय आणि श्रुतिविरोधूहि घडे ॥२४५॥
सिद्धान्ति म्हणे तेथ निर्गुणश्रुति । आत्मत्वीं योजाव्या आचार्य म्हणती ।
परी सर्वज्ञत्व सर्वशक्ति आदि सगुण श्रुति । योजणें घडेना ॥२४६॥
निर्गुण श्रुतीचेनि कोडे । सगुण श्रुतीचे आलंबन उडें ।
तरी उभय श्रुतिप्रामाण्य घडे । परस्पर उच्छेदे ॥२४७॥
तंवं पूर्वपक्षी म्हणे कही । ईश्वरा आपणामाजीं वा अन्य ठायीं ।
संसाराची प्रतीति नाही । नातरी तो होय नित्य बद्धू ॥२४८॥
ईश्वरासी संसारप्रतीति होता । त्रिपुटीनें द्वैतात्मता ।
त्याविण वरिष्ठ नाहीं तत्वता । म्हणोनी उपदेशकाविण ज्ञान न घडे॥२४९॥
ज्ञानाविण नाही मुक्ति । यालागी नित्य बद्ध जगत्पति ।
बद्धांचे वाक्य प्रमाण न होती । म्हणोनी श्रुति अप्रमाण ॥२५०॥
एवढी अनर्थपरंपरा । उगीच आकळिती होय शिरा ।
म्हणोनी परमेश्वरा । संसार प्रत्यय नाहीं ॥२५१॥
सिद्धान्ती म्हणे सत्य बोललासी । मिथ्या त्रिपुटी ईश्वरासी ।
भासतां असंग ज्ञानासी । विरोधूं नये ॥२५२॥



सावधपणें स्वप्न देखे । कां इंद्रजाळ भ्रमा पेखे ।
तरी आगळा होय हरिखे । म्लान दुःखें कदा नोहे ॥२५३॥
तैसी मिथ्या त्रिपुटी । साक्षित्वें बाधा न मानी जगजेठी ।
आणि विशेष तंव जीवास भासे हे दृष्टिसृष्टि । वादू सांगे ॥२५४॥
मिथ्या सत्यामाजीं पाहतां । आत्मप्रेमाची समचि सत्ता ।
यालागीं भगवत्प्रेम भक्ता । भगवंता समचि करी ॥२५५॥
एवं मुमुक्षुते अवश्य भक्ति ।
''यं सर्वे देवा नमन्ति मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्चेति ।
मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजंते'' इति ।
श्रुति भाष्य सांगती ज्ञानोत्तर भजन ॥२५६॥ (य१४-४०)
ब्रह्मवादीहि नमस्कार । देवासी करिती हे भक्ति ज्ञानोत्तर ।
मुक्तहि लीलामय साकार । भजती देवांना ॥२५७॥
या आचार्य भाष्यावरून । ज्ञानोत्तर भक्ति नोहे अकारण ।
ज्ञानिया निषेधिले उपासन । ते भक्तिभिन्न म्हणोनी आम्हासी इष्ट ॥२५८॥

गीताश्लोक

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥''
ही जागृच्छ्रुति । स्पष्ट सांगे की ब्रह्म झालियाहि ज्ञानिया प्रति ।
माझी परा भक्ति । अवश्य मिळे ॥२५९॥
त्या परा भक्तासीची परम प्रेम । येथ सूत्रकार म्हणती उत्तम ।
श्रीमद्भागवतींही सप्रेम । शुकाचार्य वदले पैं ॥२६०॥

श्लोक

''आत्मरामाश्च मुनयो निर्ग्रंथाऽप्युरुक्रमे ।
कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः ।

अभंग

शुकादिक मुनि स्वयं आत्माराम । कर्तव्य निःसीम गेले ज्यांचे ॥१॥
अहंकार चिदात्म्याचा अविवेक । ग्रंथीं हाचि देख फिटला आहे ॥२॥
झाले पूर्णकाम परी ते निष्काम । मेघःश्यामीं प्रेम ठेविताती ॥३॥

मुक्तीहूनि गोड माधवाची भक्ती । जाणे अभिव्यक्ति प्रेमाची ज्या ॥४॥
आळंदीवल्लभ सुखाचा सोयरा । बद्धा सिद्धा थारा त्यांचें पायीं ॥५॥

ओव्या

दृष्टिसमसमयसृष्टि । तिन्हीकाल संसाराभाव ब्रह्मापोटीं ।
म्हणोनी यावदविद्या भगवत्परीपाटी । वर्तमान जीवापेक्षा कल्पी ॥२६१॥
स्वपूर्व बद्ध कल्पन । जीवाते अनुपयोग म्हणून । स्वपूर्व मुक्तसद्गुरुकल्पन ।
ते तिन्ही काळी जगदनवच्छिन्न ब्रह्म द्योती ॥२६२॥
यालागीं सद्गुरु आळंदीश्वर । किंवा व्रजवल्लभ नंदकुमर ।
समान अनध्यस्त विवर्त साकार । तेथ प्रेम थोर ते भक्ति ॥२६३॥
''यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ'' ही श्वेताश्वतर श्रुति ।
आणि ''स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्'' इति ।
पतंजली सूत्रोक्ति । ईशही गुरु ॥२६४॥ (य१४-४१)
येथ शंका करी कोण । कीं भक्तीची अवधि ज्ञान ।
हे याचि श्रुतिवरून । सिद्ध होय ॥२६५॥

श्लोक -

''यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः''॥२६॥

(श्वेताश्वतर अ.६)

भावार्थ :-

जयाची परा भक्ति ईश्वरीं । तैसीच गुरुचरणावरी ।
सांगितलें अर्थ कूसरी । तोचि पावे ॥२६६॥
एवं देव-गुरुभक्तीचीं अवधि । जाहली आहे प्रबोधीं ।
ऐसे न म्हणावे त्रिशुद्धि । अन्यश्रुतिविरोधू म्हणोनी ॥२६७॥
''यं सर्वे देवा नमन्ति । मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्चेति'' ।
नृसिंहतापनीय श्रुति । ज्ञानियाप्रति भक्ति सांगे ॥२६८॥
''ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्'' इति ।
अष्टादशीं भगवदुक्ति । आहे कीं पराभक्तिलाभ ज्ञानिया ॥२६९॥



तेव्हां परा भक्तिचि साधन । परा भक्तिचि फळ म्हणोन ।
बोलतां विरोध म्हणोन । होईल येथे ॥२७०॥
गीतेचा विरोध सुखें येवो । ऐसे जे म्हणती सावेवो ।
ते वाळिले आम्हीं सर्व । गीता वेदसमभाव मान्य म्हणोनि ॥२७१॥
''बाप बाप ग्रंथ गीता । जो वेदीं प्रतिपाद्य देवता ।
तो श्रीकृष्ण स्वये वक्ता । जीये ग्रंथीं'' ॥

(ज्ञानेश्वरी)

या श्रीगुरु वचनासी जरी । उल्लंघू आम्ही तरी ।
त्वदुदाहृत श्रुतीचेचि निर्धारी । अपराधी होऊ ॥२७२॥
तेव्हां हेचि आम्हा करणें । पुनः समन्वय होय इतिहास पुराणें ।
म्हणोनी भाष्यादि व्याख्यानें । आम्ही येथ नमस्कारीजे ॥२७३॥

भाग. श्लोक -

''भक्तिः परेशानुभवो विरक्तिरन्यत्र चैष त्रिक एककालः ।
प्रपद्यमानस्य यथाश्नतः स्युस्तुष्टिः पुष्टिः क्षुदपायोनुधासम्''

(भाग.स्कं.११.अ.२.श्लो.४२)

भक्ति वैराग्य आणि ज्ञान । तिन्हीं एका काळी उत्पन्न ।
होती प्रपन्ना कारण । श्रुति आपण तेचि सांगे ॥२७४॥
तंव पुढती शंकती श्रोते । म्हणती विलोका पुढील श्लोकाते ।
कीं भक्तीच्या अवधींते । बोलिले आहे ॥२७५॥ (य१४-४२)

श्लोक

''इत्यच्युतांघ्रिं भजतोऽनुवृत्त्या भक्तिर्विरक्तिर्भगवत्प्रबोधः ।
भवन्ति वै भागवतस्य राजंस्ततः परां शान्तिमुपैति साक्षात्'' ॥
या श्लोकीं भक्तिअवधि शान्ति । बोलिली हे ऐकोनी म्हणे सिद्धान्ती ।
अझोनि पुसिले नाहीं एकान्ती । श्रीगुरुराया त्वां ॥२७६॥
या श्लोकाचा अर्थ । की अच्युत चरणा भजता निश्चित ।
तरी प्रेम उत्पन्न होय न मागत । अपैसाची ॥२७७॥
जो का नामस्मरण करी । प्रेम तेथ पाणी भरी ।
हे बोलिले आहे निर्धारी । तुकाराम स्वामीनी ॥२७८॥

प्रेमासवेचि ज्ञान । अपरोक्ष होय उत्पन्न ।
एरवी भजनपूर्वी जे अच्युत ज्ञान । ते तंव शास्त्र श्रवणेंचि ॥२७९॥
प्रेमें इतरत्र वैराग्य लाहे । हा अनुभव सकळासी आहे ।
किंबहुना येणेंचि होय । प्रेमपरीक्षा ॥२८०॥
हे तिन्ही जाहलिया तयापासून । चुके सहज जनन मरण ।
याचेचि नांव गा जाण । शांति म्हणोनी बोलिली ॥२८१॥
भक्तिफल सगुणदर्शन म्हणती । तया जयविजयासम कदाचिदसद्गति ।
आणि जे भक्तीचे फल निर्गुणज्ञान म्हणती । ते मुकती जीवन्मुक्तीते ॥२८२॥
म्हणोनी भक्ति वैराग्य आणि ज्ञान । भागवता एकेकाळी तीन ।
श्रुति म्हणे पराभक्ताकारण । सांगितले अर्थ प्रकाशती ॥२८३॥
तियेचाही अर्थ हा आहे । की भक्ति ज्ञान समुाय एकवेळी राहे ।
एरवी गुरुदेवसम भक्ति लाहे । कवणे परी ॥२८४॥
गुरुरूपें देवाचे ध्यान । करिता होईल परोक्ष भजन ।
आणि प्रत्यक्ष गुरूचा अवमान । घडेल तेणें ॥२८५॥
देवरूपें गुरुचे ध्यान । ''ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात्'' या सूत्राच्या अनुसंधानान ।
देवाचेचि उत्कृष्टपण । गुरूच्या ठायीं आरोपल्या जाय ॥२८६॥
तेणेंही प्रतिमासमान । गुरु जाहला होय गौण ।
मग श्रुतींतील यथा तथा वचन । अर्थनिष्पन्नरहित जाहले ॥२८७॥
(य१४-४३) म्हणोनी बापा ऐसे नाही । जाणोनी ब्रह्म लवलाहीं ।
अनध्यस्तविवर्त हृदयीं । ईश्वर जो प्रगटे ॥२८८॥
तो गुरुहूनि आन । शिष्यहृदयीं प्रगटेल कवण ।
अन्यार्थ बाधित जाहला म्हणोन । ब्रह्मज्ञानें ॥२८९॥
गुर्वादेशें जरी । हृदयीं प्रगटला हरी ।
श्रौत यथा तथा वचन तरी । साम्यता पावे ॥२९०॥
परी हे कळणें सोपे । होणें लागे कठीन प्रतापे ।
माझीही कृष्णप्रीति संकल्पें । गुरुचरणाहूनि अधिक ॥२९१॥
परी येथ मी अवश्य म्हणोनी । उचित करोत गुरु वा चक्रपाणी ।
एरवी उचित होईल हें जाणोनी । ऐसेचि कीजे ॥२९२॥



गुरु अथवा देव । कोठें तरी धरावा भाव ।
ऐसे समर्थ बोलिले सावेव । ते वाव न म्हणावे ॥२९३॥
''निर्गुण नेले संशयानें । सगुण नेले ब्रह्मज्ञानें ।
दोहीकडे अभिमानें । ओस केले'' ॥२९४॥
ऐसे दासबोधीं समर्थ । वदले यास्तव भगवद्भक्त ।
पार पावती, येर समस्त । अहंग्रस्त पडती पतनीं ॥२९५॥
तंव श्रोते म्हणती । अहो भक्तीनें मायानिवृत्ति ।
बोलिली आहे कवणे ग्रंथीं । श्रुतीस्मृतींपुराणी ॥२९६॥
''तमेव विदित्वातिमृत्युमेति । नान्यः पंथः विद्यतेऽयनाय'' इति ।
त्यास जाणोनीच मृत्यु तरति । इतर पंथ निश्चिति सांपडेना ॥२९७॥
ही श्रुति ज्ञानेंचि मोक्ष सांगत । सिद्धान्ती म्हणे हे यथार्थ ।
'ज्ञानादेव तु कैवल्यं' हे श्रौत । वचनही आहे ॥२९८॥
परंतु दुसरी श्वेताश्वतर श्रुति । काय सांगे ते ऐकावे प्रीति ।
कैसी होय मायानिवृत्ति । निश्चयें करोनी ॥२९९॥
'तस्याभिध्यानाद्योजनात्तत्त्वभावात् भूयश्चान्ते विश्वमायानिवृत्तिः'' ।
अभिध्यानें योजनें ज्ञानें होय मायानिवृत्ति ।
ऐसीही श्वेताश्वतरश्रुति । सांगतू आहे ॥३००॥
केवळ ध्यानिया क्रममुक्ति । केवल ज्ञानिया विदेहमुक्ति ।
ज्ञानी भक्तास जीवन्मुक्ति । आणि विदेहमुक्ति मिळे ॥३०१॥
सत्तेचें होय ज्ञान । ज्ञानाचे कायीसे ज्ञान ।
आनंदीं विरे अहंपण । तरी प्रेमाविण ज्ञान कैसे ॥३०२॥ (य१४-४४)
म्हणोनी भक्तिविण कांहीं । ब्रह्मज्ञाना ठिकाण नाहीं ।
हेचि श्रीमद्भागवतींही । एकादशीं द्वितीयाध्यायीं बोलिले ॥३०३॥

श्लोक

''भयं द्वितीयाभिनिवेशतस्यादीशादपेतस्य विपर्ययोऽस्मृतिः।
तन्मायया‌ऽतो बुध आभजेत्तं भक्त्यैकयेशं गुरुदेवतात्मा ॥

(भागवत स्कं.११ अ.२)

बिम्बभूत ईशत्व आपुले । प्रतिबिम्बास्तव विसरले ।

म्हणोनी अंगीं आदळले । देहाहंपण ॥३०४॥
तेणेंचि वाढले द्वैत । द्वैते भय संसार प्राप्त ।
हा आवघाचि खेळ होत । ईशमायेनें ॥३०५॥
यालागीं ईश्वरभजनाविण । मायानिवृत्ति नोहे जाण ।
येथ शिष्य करी प्रश्न । अति आवडी करोनी ॥३०६॥
म्हणे विषमसत्ताक माया । उदासीन परमात्मा तिया ।
यालागीं भजतिया न भजतिया । माया जे करील ते करो ॥३०७॥
नातरी ईश्वर होईल रागी । ऐसे ऐकोनी श्रीगुरु योगी ।
म्हणती बाळा भक्तिलागी । शंका न कीजे ॥३०८॥
माया जरी विषमसत्ताक । तरी चेतन म्हणोनी ईश्वर चालक ।
स्वतंत्र माया म्हणता देख । शिरेल सांख्य वेदान्तीं ॥३०९॥
ईश्वरीं वैराग्य आहे । हे जरी वाक्य लाहे ।
तरी औदार्यही आहे । हे कां वाक्य न घेयावे ॥३१०॥

ज्ञानेश्वरी

''आईका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ।
हे साही गुणवर्य । वसती जेथ'' ॥३११॥
ऐसे सद्गुरुवचन । तेव्हां एका गुणास्तव एकाचे उपमर्दन ।
होय हे कारण । सर्वथा न कीजे ॥३१२॥
म्हणोनी जीवाचिया भक्तिभावा । सरिसे होणे माधवा ।
अनध्यस्तविवर्तठेवा । सकल गुण रक्षी ॥३१३॥
एरवी अविद्येच्या ठायीं । या गुणांची घटना नाहीं ।
हे सहा गुण एके ठायीं । राहतील कैसें ॥३१४॥
ऐश्वर्यविरोधी वैराग्य । ज्ञान समेटिना भाग्य ।
तरी क्षण क्षणा योग्यायोग्य । वृत्ती उठतील देवातें ॥३१५॥
परी एक ज्ञान एक वृत्ति । ईश्वराचे शास्त्र सांगती ।
यालागीं अनध्यस्तविवर्तीं । गुणसंस्थिती सर्वदा ॥३१६॥
जीव याचकासाठीं धरिले । हे कनवाळुपणचि शोभले ।
यालागी तद्भजनचि वहिले । मायानाशक ॥३१७॥ (य१४-४५)





तंव श्रोते म्हणती भजन । कर्तृतंत्र होय क्रिया म्हणोन ।
वक्ता म्हणे प्रेमास्तव जाण । वस्तुतंत्र ते ॥३१८॥
करणें सोडणें आपुल्या हातीं । यालागी कर्तृतंत्रत्वा नाही महती ।
प्रेमीं विवश क्रिया होती । त्यास कर्तृतंत्र म्हणती निलाजरे ॥३१९॥
भागवतामाजीं श्रीधर । गोपीसी बोलिले देता वर ।
कीं तुमचा कामसंकल्प समग्र । किंचित् सत्य होईल कीं ॥३२०॥
येणें प्रेमाचे फल ज्ञान । होय हें न बोलावे वचन । कामसंकल्प जो
संसारसमान । तो भगवंतीं योजिता संसारफल न लाहे ॥३२१॥
हाचि तेथील भगवदुक्तीचा अर्थ । ते श्लोकही प्रमाण सांगतो येथ ।
गोपीसी बोलिले भगवंत । कात्यायनीव्रतप्रसंगीं ॥३२२॥

श्लोक

''संकल्पो विदितः साध्व्यो भवतीनां मदर्चनम् ।
मयानुमोदितः सोऽसौ सत्यो भवितुमर्हति ॥
न मय्यावेशितधियां कामः कामाय कल्पते ।
भर्जिता क्वथिता धानाः प्रायो बीजाय नेष्यते ॥
(भाग.दशम अ. २२ श्लोक २५)

अर्थ मागे बोलिला आहे । येथ कोणी म्हणती नोहे ।
प्रेमासीचि आहे । अवधी कीरू ॥३२३॥
तरी वृथा बोलणे हेही । विषयकामाही अवधी नाही ।
नातरी मुक्ति सर्वासही । कहीना कही होईलचि ॥३२४॥
परी जो करील, तया मुक्ति । हाचि सिद्धान्त आहे वेदान्तीं ।
ना तरी तत्त्वज्ञानाविण अध्यासाप्रति ।
अनाद्यनंतत्व आचार्य सांगती, त्यास विरोध ये ॥३२५॥
म्हणाल जीव अनंत म्हणोन । कोणासही मुक्ति होय हा नियमही असोन ।
अध्यासाचे अनंतपण । न निवटे सर्वया ॥३२६॥
तरी अकरणीं मुक्ति । तेणें ज्ञानाविण अज्ञाननिवृत्ति ।
होणियाची संप्राप्ति । येईल प्रसंगीं ॥३२७॥
ज्ञानीं प्रयत्न अवश्य कीजे । तरी आमुचाचि सिद्धान्त अवलंबिजे ।

पुनः एकजीववादीं एकासीचि मानिजे । अनंत स्वप्नीं ॥३२८॥
म्हणोनी ज्ञानाविण संसार अनवधि । (य१४-४६)
मग भगवत्प्रेम कां सावधि । आणि ज्ञान नोहे संसारविरोधी ।
तैसे भगवत्प्रेम संसारविरोधी नाहीं ॥३२९॥
येणेंही मानें भक्तीसी नाशक । ज्ञान हे बोलणें नोहे सम्यक ।
आतां भक्त्या विदेहमुक्ति देख । जीवाभास दृष्टीनेंचि ॥३३०॥
एकजीवदृष्टीनें कांहीं । बंधचि जंव सिद्ध नाही ।
तंव मुक्ति कोठे कायी । म्हणोनी ज्ञान लीलामात्र ॥३३१॥
तथापि ऐसिया विवेकें । अहंकार आणवमल पारुखें ।
यालागीं सुखें । भक्तीचि राहे ॥३३२॥
एरवी तत्पद-परोक्षज्ञान । घेऊनि त्वंपदविवेचन ।
करोनिया मुक्त आपण । वेदान्ती जनी म्हणविती ॥३३३॥
परी तेथ बल अनुमानाचे । ते अंग धरी जागृतीचें ।
तत्त्वंपद अपरोक्ष ठाण भक्तीचे । ते सर्वावस्थेचे समाधान दे ॥३३४॥
म्हणोनी तूर्या किंवा उन्मनी । भक्तीनें सांगती घेरंडमुनि ।
तेथ प्रेमाचिया अनिर्वाच्यपणीं । परमानंदगुणीं भक्ति उरे ॥३३५॥
ऐसी जें अखंड प्रीति । जडली होय भगवंतीं ।
तया नांव भगवद्भक्ति । त्या प्रीतीची रीति ऐकावी ॥३३६॥

प्रीतीची रीति

अहो आत्मप्रेम जो एक । विज्ञाने कळे व्यापक ।
परी व्युत्थानें अध्यास एक । झालिया न्यून ॥३३७॥
तेथ विवेक करणें घडे । तेणें वृत्तिमिषें चिदंश उघडे ।
परी आत्मप्रेम न ये कुडे । अनुभवासी ॥३३८॥
अलंबुद्धि स्वयें होणें । परी साधनातें न उच्छेदणें ।
ही आत्मप्रेमाची लक्षणें । ती विवेकचिद्वृत्तीने नाकळती ॥३३९॥
विवेकें प्रत्यक्ष होय ज्ञान । अलंबुद्धीचे करणें पडे अनुमान ।
या पर कांहीं नाहीं म्हणोन । हाचि शेवट ॥३४०॥
ऐसिया तर्काचेनि बळे । धरोनि राहणें पडे सगळे ।





म्हणोनी आनुमानिक उगळे । आत्मतृप्ति तेथ ॥३४१॥
एवढ्यानेचि तुष्टि । जरी धरील पोटीं ।
तरी देहाहंकारावच्छिन्न शेवटीं । रसास्वादीं पडे ज्ञाता ॥३४२॥
वाक्यव्यावृत्ति करिता । मज नाहीं आवश्यकता ।
आणि दुजियाते उच्छेदता । रसास्वाद तो कळे ॥३४३॥
म्हणोनी बाल्य-मौनादि विधी । ज्ञानरक्षणीं करणें प्रसिद्धि । (य१४-४७)
परी नोहे अलंबुद्धि । साचचि तेणें ॥३४४॥
साध्य आलिया हाता । लागणें साधनपंथा ।
तैसी ज्ञानियांची अवस्था । भक्तिविण ॥३४५॥
भक्तींत रसास्वाद झणी । उमटेल प्रेमोन्मादें करूनीं ।
तरी प्रेममाळें मुख्य मणि । शोभेलचि तो ॥३४६॥
''जे अभिमान वाहती अंगीं । आम्हीं हरीचे भूषावयालागीं ।
जे माझेनि लोभें जगीं । लोभिये जाहला'' ॥३४७॥ (ज्ञानेश्वरी)
इत्यादि हृदयाचार्यवचनें । ऐसे सुचविती अनुक्षणें ।
जें आघवे ज्ञान भक्तिविणें । क्षार समुद्रु ॥३४८॥
आपुलिया अहंकाराच्या संकोचे । अनाठायीं तूंपणा रचे ।
अहंकारविस्तारें साचें । हिरण्यगर्भत्व ॥३४९॥
अहंकार विस्तारला । तरी तो चिद्विवेका आला ।
निद्रेंत अवघियानी अनुभविला । आनंदविशेष विवेकाहूनि ॥३५०॥
ते स्थिति घेता होय जडपण । चिद्विवेकीं आनंदानुमान ।
परी चित् ओळखीचे आहे कारण । जे प्रेम परब्रह्म ओळखाया ॥३५१॥
ध्यानीं धरता ये जैसी मूर्ति । विवेके सांपडे जेवि चिद्दीप्ती ।
तैसी कोण्या साधनीं प्रीति । उमटली राहे ॥३५२॥
एक म्हणती देहाध्यास । आत्मप्रेमतादात्म्यें सुरस ।
केवलाद्वैतीं हा दंश । बहुजनीं विशेष निरूपिला ॥३५३॥
परी येथ कांहीं । अविद्येविण नाहीं ।
आत्मप्रेमतादात्म्य लवलाही । बोधावया हेतू ॥३५४॥
एरवी देहाहूनि पर । इंद्रिये म्हणती शाङ्र्गधर ।

**तरी आत्मतादात्म्यें साचार । तो अध्यास देहाहूनि दृढ व्हावा ॥२५५॥**
**परी डोळे कान गेले तरी जावो । माझे आयुष्य सुखाचे राहो ।**
**येणें गुणें लाहो । देहाध्यासआधिक्य ॥३५६॥**
**कोणी आळ अंगी येता । प्राण देती मानरक्षणार्था ।**
**परंतु मान देहाच्या माथा । हे घडे अवचिता देहासाठीं ॥३५७॥**
**मी अमुका रूप नामाचा । हा स्थूल विश्व अभिमानाचा ।**
**येथेंचि मानापमानाचा । उमटे ठावो ॥३५८॥**
**मध्यें इंद्रियमनाध्यास । हे तादात्म्यें विकळ न करिती विशेष** । (य१४-४८)
**परंतु कर्तृत्वभोक्तृत्वाध्यास । तो पुढें विकळ करी ॥३५९॥**
**अधर्म झालिया प्राण देती । जया परोक्षधर्मप्रतीति ।**
**ते कर्तृत्वभोक्तृत्वाध्यासीं पडती । परलोकप्रेमें ॥३६०॥**
**वैराग्यें उपाधिदुःख कळता । आत्मनि प्रगट होय सौख्यता ।**
**परी नुसध्या विवेकाच्या हाता । नाहीं नाहीं ते ॥३६१॥**
**वैराग्यें वासना मुरडे । परी उपरम ना जोडे ।**
**निरोध न करिता फुडे । ते तेवढ्यापुरते ॥३६२॥**
**निरोध उपरतीचे कारण । हे पंचदशींत बोलिले विद्यारण्य । परी मद्भक्ति**
**नसतां निरोधांतून । मुचकुंदा दशमीं व्युत्थान हरी सांगे ॥३६३॥**
**म्हणोनी व्युत्थानी भेदद्वपणें । अभेदासी जे खेळणें ।**
**चालता बोलता समाधी असणें । भक्ति मी म्हणे या नांव ॥३६४॥**
**अहो ज्ञानीं म्हणती दीन कां व्हावे । कां कवणाते उगें नमावे ।**
**परी आत्मयानें दीन व्हावे । हे म्हणे कवणू ॥३६५॥**
**अहंकारासी दीन न करितां । तरी त्या केवीं लयावस्था ।**
**निरोधाभिमानता । सहजचि फावे ॥३६६॥**
**म्हणोनी भक्तींत जरी अभिमान । तरी आत्मया पुढें अहंकार दीन ।**
**या लागीं भक्ति अवलंबन । सकळीं कीजे ॥३६७॥**
**हा परम प्रेम ओळखावया । लक्षणें बोलिली शिष्यराया ।**
**तयांच्या विकल्पसमुायसमुदाया । विचारूनि समन्वय दावूं ॥३६८॥** (अपूर्ण)

(सूक्तिरत्नावली यष्टी १४ वी, प्रथमावृत्ति, पान-४९)

31



## प्रियलीलामहोत्सव ः खंड १ ः आमंत्रणविलास

सूक्तिरत्नावली यष्टी ३ री असून ती वेगळी मुद्रित आहे. **(मूल्य- रु.८०)**

**(या ग्रंथाच्या चतुर्थ आवृत्तीचे प्राक्कथनातून)**

*__तृतीय यष्टि प्रियलिला-महोत्सव : आमंत्रण विलास__ या नांवाने श्रीगुलाबराव महाराजांचे श्रीमद्‌भागवताच्या प्रथम स्कंधावर मराठी ओवी, गद्य, हिंदी, संस्कृत असे संमिश्र भाष्य आहे. __''मधुराद्वैत दर्शनाचे मंतव्य''__ या दृष्टीने अपूर्व असे हे भाष्य होय. ह्या काळांत श्री महाराजांच्या विचारांचा नुकताच ग्रंथ रूपाने प्रसार होण्यास प्रारंभ झाला होता.म्हणून या तृतीय यष्टिला श्रीनिवासशास्त्री हरिदास व त्यांचे सहाय्यक श्री राजेश्वरराव त्रिपुरवार (हेच श्रीमहाराजांच्या मूळ विस्तृत अशा चरित्राचे लेखक होत) यांनी प्रदीर्घ असा __''परिचय''__ जोडला आहे.*

**या ग्रंथाची प्रथम आवृत्ति इ.स.१९१० मध्ये श्रीनिवास रामचंद्र हरिदास यांनी प्रसिद्ध केली. *याच ग्रंथाची दुसरी आवृत्ति दोन भागामध्ये श्री शंकरराव सोमवंशी नाशिक व त्यांचे सहाय्यक श्री.ज्ञानेश्वर उद्धव मांढरे पुणे व संपूर्ण ग्रंथावलीचे संपादक म्हणून श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी असलेले वेदांतकेसरी श्री नारायण पैकाजी उर्फ श्रीबाबाजीमहाराज पंडित होते. ही दुसरी आवृत्ति इ.स.१९४० मध्ये दोन भागात प्रसिद्ध करून ग्रंथाचे नांव __भागवतरहस्य__ ठेवण्यात आले होते. या आवृत्तीचे वैशिष्ट्य म्हणजे यात __कठिण शब्दांचे अर्थ व विवरण स्वतः श्रीबाबाजी महाराजांनी लिहून समाविष्ट केले होते.__ ही गोष्ट श्री काशीनाथ जनार्दन आठवले (निवृत्त सत्र व जिल्हा न्यायाधीश नागपूर) यांनी श्री बाबाजी महाराजांचे जवळ श्रीगुलाबराव महाराजांच्या ग्रंथाचे अध्ययन करून त्याचे विस्तृत टिपण लिहून ठेवले. त्यांत नमूद केले आहे. 'अभ्यासासाठी शब्दार्थ-टीपा श्रीबाबाजी महाराजांच्याच असल्याने आवृत्ति पहिली न घेता मुद्दाम दुसरी आवृत्ति अभ्यासासाठी वापरली' असे त्यांचे नोट्सचे वहीत लिहिले आहे. *याच ग्रंथाची तिसरी आवृत्ति इ.स.१९८१ साली नागपूरवरून प्रसिद्ध झाली. यात शब्दार्थाच्या टीपा समाविष्ट आहेतच व नांव मात्र पहिल्या आवृत्तीचेच 'प्रियलीलामहोत्सव' (आवृत्ती २ चे 'भागवतरहस्य' हे नांव वगळले ) हे कायम ठेवून त्यांत श्री महाराजांच्या भागवतावरील __द्वितीय स्कंधावरील अपूर्ण भाष्याचा समावेश__ केला होता. यावर मात्र शब्दार्थाच्या टीपा नाहीत व या अपूर्ण ग्रंथाचा __(प्रियलीला महोत्सव : दुसरा खंड : आगमन विलास)__ यष्टी १४ मध्ये इतर मराठी ओवीबद्ध ग्रंथ सांख्यसुरेंद्र व नारदीय भक्तिसूत्रभाष्य या सोबत समावेश आहे..त्यानुसार प्रस्तुत आवृत्ती आहे.*

***– प्रा. देवराव भुजाडे / प्रा. शरद पाटील***